मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २४८ ■ गुरुवार, २१ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ‘सीएसआर’ निधीच्या उपयोगातून महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर)च्या माध्यमातून देशात दरवर्षी सुमारे 36 हजार कोटी रुपये खर्च केले जातात. हा निधी खर्च करण्यामध्ये महाराष्ट्र अव्वल स्थानी आहे. सीएसआर निधीच्या उपयोगातून समाजात शासकीय योजनांचा प्रभाव अनेक पटीने वाढवता येऊ शकतो. त्यामुळे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचत असून महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय लिहिला जात असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

हॉटेल प्रेसिडेंटच्या सभागृहात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्यावतीने आयोजित टेक महा इम्पॅक्ट परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव परिमल सिंग, महा आयटीच्या आयुक्त भुवनेश्वरी एस, इलेक्ट संस्थेचे रवी गुप्ता, माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे मुख्य परिचलन अधिकारी भगवान पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात सर्वाधिक सीएसआर निधी उपलब्ध होतो. या निधीचा मोठा हिस्सा मुंबई आणि पुणे महानगर प्रदेशात खर्च होतो. हा निधी केवळ काही विशिष्ट भागांपुरता मर्यादित न राहता या निधीच्या उपयोगातून संपूर्ण राज्यांमध्ये परिणामकारक काम होण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. ‘व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव्ह‘ उपक्रम अंतर्गत शासनाने सीएसआर भागीदारांच्या मदतीने एक हजार




गावांचा कायापालट करून ती गावे ‘शाश्वत विकास ध्येयांवर’ आधारित बनवली आहे. या अनुभवावरून स्पष्ट होते की, जेव्हा शासकीय यंत्रणा, व्याप्ती आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील लवचिकता, तंत्रज्ञान व संसाधने एकत्र येतात, तेव्हा सामाजिक क्षेत्रात ‘गुणाकार प्रभाव’ पाहायला मिळतो.

सीएसआर भागीदारांच्या लवचिकतेमुळे शासकीय योजनांमध्ये समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करून आवश्यक ते बदल करणे शक्य असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, टेक कंपन्या केवळ निधी देत नसून नवीन तंत्रज्ञान आणत आहेत, ज्यामुळे सीएसआर निधीचा वापर अधिक पारदर्शक आणि मोजता येण्याजोगा झाला आहे. कंपन्यांना त्यांच्या निधीचा थेट प्रभाव पाहायचा असतो. शासनासोबत भागीदारी करताना सीएसआर निधीतील प्रत्येक पैशाचा वापर थेट सर्वसामान्यांच्या कल्याणासाठीच केला जाईल. कोणत्याही अतिरिक्त व्यवस्थेवर किंवा पायाभूत सुविधेवर तो वाया जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या सर्व सीएसआर भागीदारांचे आभार मानत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र शासनासोबतचा हा प्रवास अत्यंत सुलभ आणि समृद्ध ठरेल. या परिषदेने सामाजिक परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू केला आहे.

महाराष्ट्र हे देशाचे वित्तीय इंजिन असून, राज्याचा समावेशक व प्रगतीशील विकास करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीच्या समन्वयातून महाराष्ट्र अधिक समृद्ध होणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, राज्य अधिक समावेशक, समृद्ध आणि भविष्यवेधी बनवण्याचा दृढ संकल्प टेक महा इम्पॅक्ट परिषदेच्या माध्यमातून करण्यात आला आहे. ‘तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि सीएसआर निधीच्या माध्यमातून समुदायांचे सक्षमीकरण हे आज आपल्या राज्याच्या विकासाचे मूळ सूत्र आहे. जोपर्यंत शासन, तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्र एकमेकांच्या हातात हात घालून चालत नाहीत, तोपर्यंत प्रगतीचे फायदे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू शकत नाहीत. महिला, तरुण, ग्रामीण भाग आणि समाजातील वंचित घटकांपर्यंत विकासाची फळे पोहोचवणे हे सरकारचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.


कोणतीही तांत्रिक प्रणाली तेव्हाच यशस्वी मानली जाते, जेव्हा ती सामान्य माणसाचे जीवन सुकर करते. ‘स्मार्ट सिटी’ किंवा ‘डिजिटल इंडिया’चा खरा केंद्रबिंदू हा सामान्य माणूसच असायला हवा. देशात सर्वाधिक सीएसआर निधी महाराष्ट्रात खर्च होतो. सीएसआर निधी आणि शासकीय योजनांमध्ये उत्तम समन्वय साधला, तर शेवटच्या घटकांपर्यंत सेवांची पोहोच अधिक प्रभावीपणे करता येईल. आजच्या काळात केवळ पदवी पुरेशी नसून त्याला कौशल्याची जोड मिळणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि महिलांना तंत्रज्ञानाची ताकद दिल्यास ते राज्याच्या प्रगतीचे चित्र बदलू शकतात, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या. यावेळी त्यांनी बारामती मधील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर कृषीमध्ये करण्यात येत असलेल्या नवोपक्रमांची माहिती दिली.

## वादळी वाऱ्यांमुळे मुंबई-अलिबाग जलप्रवास 26 मेपासून बंद; मेरीटाईम बोर्डाचा प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मोठा निर्णय

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी :** कोकण किनारपट्टीवर सुरू असलेल्या वादळी वारे आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर गेट वे ऑफ इंडियाहून अलिबागच्या मांडवा येथे जाणारी प्रवासी जलवाहतूक यंदा नियोजित वेळेपेक्षा सहा दिवस आधीच बंद करण्यात येणार आहे. मेरीटाईम बोर्डाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार ही सेवा 26 मेपासून बंद राहणार असून, 1 सप्टेंबरपासून पुन्हा सुरू केली जाणार आहे.

मुंबई ते मांडवा हा जलमार्ग राज्यातील सर्वाधिक प्रवासी वर्दळ असणाऱ्या मार्गांपैकी एक मानला



जातो. दररोज साधारण तीन हजार तर सुट्टीच्या दिवशी आठ ते दहा हजार प्रवासी या मार्गाचा वापर करतात. गेट वे ऑफ इंडियापासून अलिबागपर्यंत अवघ्या दीड तासात पोहोचता येत असल्याने पर्यटक आणि स्थानिक प्रवासी दोघांमध्येही या सेवेला मोठी मागणी असते. सकाळी सहा वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत पीएनपी, मालदार, अंजठा यांसारख्या खाजगी कंपन्यांच्या प्रवासी बोटी या मार्गावर धावतात.

पावसाळ्यात समुद्र खवळलेला असतो, मोठमोठ्या लाटा उसळत असतात. अशा स्थितीत गेट वे ऑफ इंडिया परिसरात बोटींना सुरक्षितपणे थांबवणे कठीण जाते. खोल समुद्रात हलक्या प्रवासी बोटींचे संचालन धोकादायक ठरू शकते. त्यामुळे प्रवाशांच्या जीविताच्या दृष्टीने ही सेवा दरवर्षी ठराविक कालावधीसाठी बंद ठेवण्याची पद्धत आहे. यंदा मात्र सततचा वारा आणि जोरदार पावसामुळे ही बंदी सहा दिवस आधीच लागू करण्यात आली आहे.

दरम्यान, गेट वे ऑफ इंडियाहून मांडवा दरम्यानची जलप्रवासी सेवा बंद होणार असली तरी भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो-रो सेवा मात्र नियमित सुरू राहणार आहे. त्यामुळे स्वतःच्या वाहनासह अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.मेरीटाईम बोर्डाने प्रवाशांनी पर्यायी प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन केले आहे. तसेच हवामानाचा अंदाज आणि समुद्री परिस्थिती पाहूनच पुढील निर्णय घेतले जातील, असेही बोर्डाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## द व्हिजन स्कूल सेलूचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** ग्रँडमास्टर चेस अकॅडमी संभाजीनगर यांच्या वतीने दिनांक 17 मे रोजी इंटर स्कुल चेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये परभणी जिल्ह्यातील व्हिजन इंग्लिश स्कूल सेलू यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे . या स्पर्धेमध्ये विविध गटा मध्ये अनेक शाळांच्या विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता द व्हिजन स्कूल चे विद्यार्थी निमित काला, भानुदास जवळेकर




आणि सुदर्शन जाधव यांनी अत्यंत चांगली कामगिरी करून परभणी जिल्ह्यातून अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवला आहे मुलांच्या या यशाबद्दल शाळेचे संचालक श्री संतोष कुलकर्णी सर तसेच मुख्याध्यापक श्री गोविंद जाधव सर आणि प्रशिक्षक श्री अविनाश धानोरकर सर यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

## आत्मनिर्भर पंचायत पुरस्कारात देशात अव्वल ठरलेल्या वासांबे–मोहोपाडा ग्रामपंचायतीचे हरेश उतेकर यांच्याकडून कौतुक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (आनंद पवार) :** रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात असलेल्या वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीने केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयामार्फत देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या “आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार” स्पर्धेत संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक पटकावून रायगड जिल्ह्याचा मान उंचावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रसायनी विभागीय अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक हरेश उतेकर यांनी सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, सर्व सदस्य व ग्रामस्थांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

याबाबत प्रतिनिधीशी बोलताना हरेश उतेकर म्हणाले की, “वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीने केलेले कार्य हे संपूर्ण राज्यासाठी आदर्शवत आहे. गावाच्या विकासासाठी स्वतःचे महसूल स्त्रोत निर्माण करून त्याचा उपयोग नागरिकांच्या सोयीसुविधा, पायाभूत विकास आणि ग्रामविकासासाठी प्रभावीपणे करण्यात आला. त्यामुळेच ग्रामपंचायतीने राष्ट्रीय



स्तरावर हा मानाचा किताब मिळवला आहे.”

केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयामार्फत गावांचा आर्थिक विकास, महसूल वाढ आणि स्वयंपूर्ण ग्रामविकास या निकषांवर आत्मनिर्भर पंचायत पुरस्कार दिला जातो. वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीने मनोरंजन कर, व्यवसाय कर, आठवडा बाजार कर यांसारख्या करेत्तर महसूल स्त्रोतांद्वारे ग्रामपंचायतीचा महसूल वाढवून गावातील विविध विकासकामे आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

ग्रामपंचायतीच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेत रायगड जिल्हा परिषद व महाराष्ट्र शासनाने वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीची शिफारस केंद्र शासनाकडे केली होती. त्यानंतर केंद्र सरकारच्या विशेष समितीने प्रत्यक्ष ग्रामपंचायतीला भेट देऊन विकासकामांचे परीक्षण केले. ग्रामपंचायतीची आर्थिक शिस्त, विकासकामांची गुणवत्ता, नागरिकाभिमुख उपक्रम आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल पाहून समितीने समाधान व्यक्त केले होते. विविध निकषांवरील ओलं मूल्यांकनानंतर सन २०२४-२५ चा आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार” वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीला जाहीर करण्यात आला. या यशासाठी सरपंच सौ. उमाताई मुंढे,


उपसरपंच,ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील,सर्व सन्माननीय सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थांनी केलेल्या परिश्रमाचे हरेश उतेकर यांनी विशेष कौतुक केले.

ग्रामविकासाच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताची संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचे काम वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीने केले आहे.भविष्यातही ग्रामपंचायत अशाच प्रकारे विकासाची नवी उंची गाठेल असा विश्वास व्यक्त करत हरेश उतेकर यांनी सर्व पदाधिकारी व ग्रामस्थांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.,

## मुख्य कार्यालयात ढासळलेली शिस्त: पेण उपप्रादेशिक कार्यालयावर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी :** शासनाने ठरविलेल्या स्पष्ट नियमांचे उल्लंघन करत पेण येथील उपप्रादेशिक कार्यालयात मंगळवारी सकाळी उजेड लागेपर्यंतच परिस्थिती वळवळलेली आढळली. निर्धारित वेळेने आधीच कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश असताना सकाळी साडेदहा वाजेपर्यंत चौकशीत केवळ विजय चौधरी हे एकमेव अधिकारी उपस्थित होते; इतर अधिकारी व कर्मचारी न दिसले.आश्चर्य म्हणजे, अनेक विभागांमध्ये फॅन आणि लाईट सुरू ठेवले असल्यामुळे वीजेची उघडपणे वाया जाण्याचे प्रमाण जाहीर झाले. शासनाने राष्ट्रीय वीज बचत आणि ऊर्जा संवर्धनाचे ठोस निर्देश दिलेले असताना, कार्यालयात



असलेल्या विजेच्या उधळणीमुळे प्रश्न उपस्थित झाले आहेत की काय आपल्या आदेशांची वास्तविकता काय आहे?स्थानिक नागरिकांची नाराजी तेजस्वी झाली असून, कार्यालयातील ढिसाळ शिस्त, वेळेचे पालन न होणे आणि जबाबदारीचा अभाव यामुळे "सेवेकरता आलेल्यांना काळजीपूर्वक वाट पहावी लागली."जर जिल्ह्याच्या महत्त्वाच्या कार्यालयातच ही अवस्था असेल, तर सामान्य जनतेला न्याय आणि सेवा नेमकी कुणाकडे विचारायची?" असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उभा राहिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार दूरध्वनीवर संपर्क साधल्यावर उपप्रादेशिक अधिकारी माधव सूर्यवंशी यांनी सांगितले की ते पनवेल येथे कामानिमित्त गेले होते आणि शासनाच्या नियमांनुसार सकाळी ९.४५पर्यंत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कार्यालयात हजर राहणे बंधनकारक आहे. अनुपस्थित आढळलेल्या कर्मचाऱ्यांविरुद्ध चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट सांगितले. त्यांनी मंगेश नाईक यांना शासकीय कामासाठी बाहेर पाठविण्यात आल्याचीही माहिती दिली.

तथापि, उपप्रादेशिक कार्यालयातील उर्वरित अधिकारी-कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, अनियमित व्यवहार आणि विजेची बेशिस्त उधळण या कारणांमुळे पेण उपप्रादेशिक कार्यालयाचा ढिसाळ आणि निष्काळजी प्रवृत्तीचा प्रश्न पुन्हा सार्वजनिक मुद्दा झाला आहे. स्थानिकांमध्ये आता प्रशासकीय जबाबदारी आणि संवाद याबद्दल शंका निर्माण झाली आहे. ह्यावर पुढील तपास आणि प्रशासनाकडून तडजोड न करता कारवाई होणार की नाही, हे येत्या दिवसांत स्पष्ट होईल; परंतु लोकअपेक्षांना शांत व व्यवस्थित सेवा देण्यासाठी कार्यालयातील त्वरित शिस्तबद्धता आणि ऊर्जा व्यवस्थापनावर योग्य पावले उचलणे अत्यावश्यक आहे.

# न्यूईरा हॉस्पिटलमध्ये पहिल्यांदाच यशस्वी यकृत प्रत्यारोपण

## पत्नीने यकृताचा भाग दान करत पतीला दिले नवे आयुष्य





**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : प्रेम, धैर्य आणि समर्पणाची प्रचिती देणाऱ्या एका प्रकरणात 43 वर्षीय महिलेने आपल्या पतीचे प्राण वाचवण्यासाठी स्वतःच्या यकृताचा एक भाग दान केला. 48 वर्षीय पती दीर्घकाळापासून गंभीर यकृत विकाराशी झुंज देत होते. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती आणि अखेर लिव्हर ट्रान्सप्लांट हाच त्यांच्यासाठी एकमेव पर्याय उरला होता. वाशीच्या न्यूईरा हॉस्पिटलमध्ये प्रथमच करण्यात आलेल्या या अत्यंत गुंतागुंतीच्या 'यकृत प्रत्यारोपण' शस्त्रक्रियेला यश आले.

जी.आय. (G.I.) सर्जरी आणि यकृत प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. अनुराग श्रीमाल आणि डॉ. रोहन चौधरी यांच्या नेतृत्वाखाली तसेच गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि हिपॅटोलॉजी विभागातील डॉ. अमितकुमार मांडोत आणि डॉ. चेतन कलाल यांचा समावेश असलेल्या डॉक्टरांच्या टीमने, एका अत्यंत गुंतागुंतीच्या 'जिवंत दात्याकडून यकृत प्रत्यारोपणाची' (Living Donor Liver Transplant) शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. रुग्णाला डॉ. मनीष पेंडसे यांच्या देखरेखीखाली रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तर अतिदक्षता विभागातील (ICU) अत्यंत महत्त्वाचे व्यवस्थापन डॉ. चंद्रशेखर तुळशीगेरी आणि डॉ. निशात तावडे यांच्या देखरेखीखाली करण्यात आले . डॉ. अदिती जैन आणि डॉ. विनोद यादव यांचा समावेश असलेल्या 'आयसीयु लिव्हर ट्रान्सप्लांट टीम'ने, शस्त्रक्रियेनंतरच्या रुग्णाच्या देखरेखीमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. भूलतज्ज्ञ (Anaesthesiologists) डॉ. अनिल सिंग आणि डॉ. आदित्य प्रभुदेसाई, डॉ वैशाली शेंडे यांच्या सहकार्याने, या संपूर्ण टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पाडण्यासाठी सुरळीतपणे काम केले.या प्रत्यारोपणासाठी तब्बल 18 डॉक्टर आणि सर्जन्स तसेच सुमारे 20 परिचारिका व सहाय्यक कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे काम केले.*

नेरुळ येथील 48 वर्षीय मुकेश रामचंद्र तांडेल हे एक रिक्षाचालक असून* गेल्या दोन वर्षांपासून गंभीर यकृताच्या आजाराने त्रस्त झाले होते. कालांतराने त्यांना 'डीकंपेन्सेटेड क्रॉनिक लिव्हर डिसीज' हा गंभीर आजार झाला. त्यामुळे त्यांना कावीळ, पोटात मोठ्या प्रमाणात पाणी साचणे (ॲसाइटिस), मेंदूच्या कार्यावर परिणाम करणारी 'हेपॅटिक एन्सेफालोपॅथी', युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन, किडनी दुखापत आणि डाव्या पायाला सेल्युलायटिससारखे गंभीर संसर्ग झाला.

त्यांची प्रकृती इतकी खालावली होती की चालणे, व्यवस्थित जेवणे किंवा अंथरुणावरुन उठणेही कठीण झाले होते. सततचा अशक्तपणा, पोटातील सूज आणि वाढत्या त्रासामुळे त्यांचे दैनंदिन आयुष्य पूर्णपणे विस्कळीत झाले होते. अशा परिस्थितीत लिव्हर ट्रान्सप्लांट हाच त्यांच्या जगण्याचा एकमेव मार्ग होता.

यावेळी त्यांच्या पत्नी जनाबाई तांडेल यांनी कोणताही विचार न करता यकृताचा भाग दान करण्याचा निर्णय घेतला. स्वतः पूर्णपणे निरोगी असूनही मोठ्या शस्त्रक्रियेसाठी पुढे येणे हा अत्यंत धाडसी निर्णय होता.

डॉ. अनुराग श्रीमल( जी.आय. (G.I.) सर्जरी आणि यकृत प्रत्यारोपण तज्ज्ञ) म्हणाले,* रुग्ण आमच्याकडे आला तेव्हा त्याचा आजार अत्यंत गंभीर अवस्थेत होता. लिव्हर फंक्शन टेस्टमध्ये गंभीर बिघाड दिसून आला होता, तर सोनोग्राफीमध्ये लिव्हर सिऱ्होसिसचे निदान झाले होते. त्यांना कावीळ, पोटात मोठ्या प्रमाणात पाणी साचणे आणि मेंदूवर परिणाम करणारी लक्षणे दिसत होती. याशिवाय यकृताला इजा, मूत्राशयाचा संसर्ग आणि पायातील सेल्युलायटिसमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली होती. अशा अवस्थेत लिव्हर ट्रान्सप्लांट हा एकमेव पर्याय उरला होता.

प्रत्यारोपणापूर्वी जवळपास दोन महिने डॉक्टरांच्या टीमने रुग्णाला स्थिर करण्यासाठी प्रयत्न केले. यामध्ये पोटातील पाणी वारंवार काढणे, संसर्गांवर उपचार आणि स्नायूंची होणारी झीज नियंत्रित करत उपचार करण्यात आले.

तपासणीदरम्यान पत्नीच्या यकृतामध्ये 'ड्युअल पोर्टल वेन्स' ही दुर्मिळ रक्तवाहिन्यांची रचना आढळून आली. तसेच यकृतात थोडेफार फॅटही होते. त्यामुळे शस्त्रक्रिया अधिक गुंतागुंतीची ठरली होती. सर्व वैद्यकीय तपासण्या पूर्ण झाल्यानंतर 15 एप्रिल 2026 रोजी प्रत्यारोपण करण्यात आले.

डॉ. श्रीमल पुढे म्हणाले,* पत्नीच्या यकृताच्या उजव्या बाजूकडील सुमारे ६५ टक्के टक्के भाग प्रत्यारोपित करण्यात आला. रुग्णाला प्रगत सिरॉसिस, पोर्टल हायपरटेन्शन आणि त्याच्या पोटात मोठ्या प्रमाणात द्रव साचल्याने शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक होती. शस्त्रक्रियेदरम्यान आणि त्यानंतर रुग्णाला रक्तसंक्रमणाची गरज भासली. शस्त्रक्रियेनंतर एक दिवस रुग्णाला व्हेंटिलेटर आणि विशेष औषधांच्या सपोर्टवर ठेवावे लागले. ही संपूर्ण प्रक्रिया सुमारे 12 ते 13 तास चालली.

डॉ. रोहन चौधरी (जी. आय. (G.I.) सर्जरी आणि यकृत प्रत्यारोपण तज्ज्ञ) म्हणाले,* रुग्णाच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा दिसून येऊ लागली. काही दिवसांतच व्हेंटिलेटर काढण्यात आले. प्रत्यारोपित यकृत योग्यरित्या कार्यरत असल्याचे स्कॅनमध्ये दिसून आले. रुग्ण पुन्हा चालू लागल आणि त्यांची प्रकृती स्थिर झाली. पत्नीला एका आठवड्यातच घरी सोडण्यात आले, तर रुग्ण मुकेश यांना 24 एप्रिल 2026 रोजी स्थिर अवस्थेत घरी सोडण्यात आले.

एक महिन्यानंतरच्या तपासणीत दोघांची प्रकृती चांगली सुधारणा दिसून आली. रुग्ण सध्या आवश्यक औषधे घेत असून त्यांची जीवनशैली आणि आरोग्यामध्ये सुधारणा झाली आहे. लवकरच ते दैनंदिन कामकाजास सुरूवात करतील अशी माहिती डॉक्टरांनी दिली.

डॉ चौधरी पुढे म्हणाले,* लिव्हिंग डोनर लिव्हर ट्रान्सप्लांट ही अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया आहे. यासाठी अचूक नियोजन आणि अनुभवी टीमची आवश्यकता असते. मात्र या प्रकरणात सर्वात प्रेरणादायी गोष्ट म्हणजे रुग्णाच्या पत्नीचे धैर्य. योग्य वैद्यकीय तपासणी आणि काळजी घेतल्यास दाता आणि रुग्ण दोघेही पूर्णपणे बरे होऊ शकतात.

रुग्ण मुकेश तांडेल म्हणाले,* मी जगण्याची आशाच सोडून दिली होती. प्रत्येक दिवस संघर्षाचा होता. पण माझी पत्नी माझ्यासाठी खंबीरपणे उभी राहिली. तिच्यामुळे मला नवे आयुष्य मिळाले. डॉक्टरांनी योग्य वेळी उपचार केल्यामुळे आज मी पुर्ववत आयुष्य जगु शकतो.

पत्नी जनाबाई तांडेल म्हणाल्या,* माझ्या पतीची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्याचे पाहून मी यकृत दानाचा निर्णय घेतला. त्यांना वाचवण्यासाठी मी जे काही करू शकत होते ते मी केले.

रुग्णालयाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी सांगितले की,* ही केवळ एक यशस्वी शस्त्रक्रिया नाही, तर मानवी नात्यांमधील प्रेम आणि त्यागाची भावनेचे उत्तम उदाहरण आहे. भारतात अवयवदानाबाबत आजही जागरूकतेचा अभाव दिसून येतो. समाजात अवयवदानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी हे एक उत्तम उदाहरण ठरत आहे

# मराठा सेवा संघ महागाव तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप




**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ)** - मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार घेऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत असते.यावर्षीही असाच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मातोश्री विद्यालय महागाव येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीच औचित्य साधून उत्साहात संपन्न झाला. या गुणगौरव सोहळ्याचे उद्घाटक व मार्गदर्शक महागाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री दत्तात्रय कदम, अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे,मार्गदर्शक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यशवंत देशमुख, प्रमुख पाहुणे काँग्रेस कमिटीचे माजी तालुकाध्यक्ष डॉ. अरुण पाटील, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष आशिष गावंडे होते. या गुणगौरव सोहळ्याची सुरुवात राजमाता,राष्ट्रमाता, जिजाऊ व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब लिखित मराठा सेवा संघाने महाराष्ट्राला काय दिले? ही पुस्तिका देऊन करण्यात आले. यानंतर सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते महागाव तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा 2026 इयत्ता दहावी व बारावी मध्ये तालुक्यातून प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या व प्रत्येक शाळेतील पहिल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा घाटंजी येथे पात्र झालेल्या तीन विद्यार्थ्यांचा अशा एकूण 125 गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा गौरवपत्र, मराठा सेवा संघाची शिवधर्म दिनदर्शिका, पुष्पगुच्छ व पेन देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. गटविकास अधिकारी श्री दत्तात्रय कदम यांनी विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या कर्तुत्वानुसार आपल्या जीवनाचे सार्थक करावे असे सांगितले तसेच मराठा सेवा संघाचा हा स्तुत्य उपक्रम असून सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक श्री यशवंत देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आत्मविश्वास बुलंद ठेवावा, येणाऱ्या आव्हानांना तोंड द्यावे तसेच छत्रपती संभाजी महाराजांचा कर्तृत्ववान वारसा जपावा असे सांगितले तसेच संस्कारामुळे आलेले श्रीमंती टिकून असते व संस्काराशिवाय आलेली श्रीमंती ही विकाऊ असते असे सांगितले. या गुणगौरव सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे,सहसचिव अमोल जगताप, तालुका अध्यक्ष उदयभाऊ नरवाडे,तालुका सचिव पंकज देशमुख,तालुका सदस्य चतुर्वेद अडकिने, स्वप्निल नरवाडे,तेजस नरवाडे, श्री अभ्यासिका व श्री कम्प्युटर चे संचालक मंगेश पाटील वानखेडे, शिक्षक अमोल शिंदे,रवी भांगे, विजय कदम,अंकुश शिंदे, किशोर सोळंके यांनी प्रयत्न केले.

# १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** : शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य आयोजित १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या निमित्ताने समाजातील विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक, साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील प्रज्ञावंतांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे. यावर्षीच्या पुरस्कारांसाठी मंहत राधाताई महाराज आईसाहेब श्री क्षेत्र मीराबाई संस्थान महासांगवी ता पाटोदा तसेच मंदाकिनी शिरसाट (पाथर्डी), लीलावती सरोदे (लोणी), तसेच प्रा. डॉ. सुनील शिंदे (अकोले) डॉ.अर्चना घोडके (नाशिक) व सुलोचना बेल्हेकर, नेवासा यांची निवड करण्यात आल्याची माहिती संमेलन संयोजन समिती सदस्य बाळासाहेब शेंदुरकर व राज्य कार्यकारणी सदस्य सुभाष सोनवणे यांनी दिली.

पाथर्डी येथील श्रीमती मंदाकिनी सहदेव शिरसाट या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना "शब्दगंध सामाजिक कार्य गौरव पुरस्कार" प्रदान करण्यात येणार आहे. मंहत राधाताई महाराज आईसाहेब

श्री क्षेत्र मीराबाई संस्थान महासांगवी ता पाटोदा या सामाजिक प्रबोधन व धार्मिक कार्यात सातत्याने सक्रिय असून त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना "स्वातंत्र्यसैनिक हरिश्चंद्र शेंदुरकर स्मृती पुरस्कार" जाहीर करण्यात आला आहे. तसेच डॉ. अर्चना घोडके या नाशिक येथील असून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान मोठे आहे, त्यांना शब्दगंध शैक्षणिक कार्य गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.लोणी येथील लीलावती भाऊसाहेब सरोदे यांनाही सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घकालीन कार्याबद्दल याच पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच अकोले येथील प्रा. डॉ. सुनील शिंदे यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना "स्व. अण्णासाहेब देशमुख स्मृती पुरस्कार" प्रदान करण्यात येणार आहे.




या पुरस्कारांचे वितरण रविवारी सायंकाळी ४ वाजता होणार असून अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते हा सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमास महाराष्ट्र साहित्य परिषद चे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश सोमणयांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास सामाजिक, साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शब्दगंध साहित्यिक परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. जी. पी. ढाकणे, प्रा. डॉ. अनिल गर्जे, बबनराव गिरी व राजेंद्र चोभे प्रा श्री अनिल गर्जे , प्रा.गोंदकर सर यांनी यांनी केले आहे.

# देवणी तहसीलदारांच्या कारभाराविरोधात तालुक्यात तीव्र संताप; तात्काळ बदलीची नागरिकांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी तहसील कार्यालयाचा कारभार सध्या अत्यंत वादग्रस्त ठरत असून, तहसीलदार सर्व अधिकार स्वतःकडे ठेवून मनमानी कारभार करत असल्याचा आरोप तालुक्यातील नागरिकांमधून होत आहे. या कारभारामुळे अकरावी, पॉलिटेक्निक आणि आयटीआय प्रवेशासाठी लागणारे जात प्रमाणपत्र व इतर शासकीय दाखले वेळेवर मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असून परिणामी, 'भ्रष्ट' कारभार करणाऱ्या तहसीलदारांची देवणी तालुक्यातून तात्काळ बदली करावी, अशी तीव्र मागणी आता नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

***टिप्पर हायवा जप्तीचा घोळ नक्की काय***

मिळालेल्या माहितीनुसार, ११ एप्रिल २०२६ पासून देवणी पोलीस ठाण्यात दोन टिप्पर हायवा जप्त करून ठेवण्यात आले आहेत. या संदर्भात तहसील कार्यालयाकडून सांगण्यात आले की, संबंधित वाहनांकडून दंडाची वसुली करण्यात आली आहे. मात्र, देवणी पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, दंडाची रक्कम अद्याप जमा न झाल्यामुळेच हे टिप्पर सोडण्यात आलेले नाहीत. याशिवाय जेसीबी आणि पोकलेन मशीनबाबत साडेसात लाख रुपयांची दंड वसुली अजून बाकी असल्याचे समजते. पोलीस आणि तहसील कार्यालयाच्या या परस्परविरोधी माहितीमुळे प्रशासकीय पातळीवर मोठा घोळ सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे.

*माती वाहतूक प्रकरणात तहसीलदारांचे संगनमत*

मागील काही दिवसांपूर्वी तालुक्यात झालेले शासकीय माती वाहतूक प्रकरण हे थेट तहसीलदारांच्या संगनमताने आणि आशीर्वादाने झाल्याची जोरदार चर्चा देवणी तालुक्यात रंगली आहे. हे मोठे प्रकरण दडपण्यासाठी आणि कारवाईचा देखावा करण्यासाठी तहसीलदार आता लहान ट्रॅक्टर चालक, वाळू वाहतूकदार यांच्यावर छापे टाकून दंडात्मक कारवाईचा बडगा उगारत असल्याचा आरोप वाहनधारकांनी केला आहे.

***विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला***

या सर्व कारवाईच्या धांदलीत आणि आर्थिक देवाणघेवाणीच्या चर्चांमध्ये तहसीलदारांनी सर्व शासकीय अधिकार स्वतःकडेच केंद्रित करून ठेवले आहेत . सध्या तालुक्यात अकरावी, आयटीआय आणि पॉलिटेक्निकचे प्रवेश सुरू झाले आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला यांची अत्यंत गरज आहे. मात्र, तहसीलदार या महत्त्वाच्या कामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने दाखल्यांचे काम पूर्णपणे रखडले आहे.

***नागरिकांचा आक्रमक पवित्रा***

"स्वतःचे कथित गैरव्यवहार लपवण्यासाठी तहसीलदार सर्वसामान्य नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना वेठीस धरत आहेत. देवणी तालुक्याला अशा पद्धतीचा कारभार करणारे तहसीलदार नकोत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित तहसीलदारांची तात्काळ बदली करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा तालुक्यातील संतप्त नागरिकांनी व पालकांनी दिला आहे.

# राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणासाठी महागावच्या महिला सरपंचांची प्रशिक्षक म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव** : यवतमाळ जिल्ह्यातील महागाव येथील सरपंच सौ. जयश्री राठोड यांची हैदराबाद येथे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील "Championing Change : Empowering Women Leaders in Local Governance" या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमासाठी Trainer म्हणून निवड करण्यात आली आहे.

हा पाच दिवसीय राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम १८ ते २२ मे दरम्यान NIRDPR, राजेंद्रनगर, हैदराबाद येथे पार पडत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला नेतृत्व सशक्त करण्याच्या उद्देशाने देशभरातून निवडक महिला प्रतिनिधींना या प्रशिक्षणासाठी संधी देण्यात आली आहे.

एका ग्रामीण भागातील महिला सरपंच म्हणून राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षक म्हणून निवड होणे ही महागावसह यवतमाळ जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या निवडीबद्दल प्रा.सौ. जयश्री सुनील राठोड यांनी आपल्या यशाचे श्रेय वरिष्ठ मार्गदर्शक, सहकारी, कुटुंबीय आणि गावातील मायबाप




जनतेला दिले आहे. "जनतेचा विश्वास, प्रेम आणि आशीर्वाद यामुळेच हा मान मिळाला असून पुढेही महिलांच्या सशक्तीकरणासाठी आणि समाजहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करत राहीन," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# उन्हाळी शिबीरातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी घेतली पोलीस आयुक्त, नागपूर यांची भेट आणि लुटला नागपूर मेट्रो सफारीचा व VR MALL मधील खेळाचा आनंद...!

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय देवरी जि.गोंदिया अंतर्गत येत असलेल्या शासकिय कन्या आश्रमशाळा बोरगाव/बा येथील उन्हाळी शिबिरातील विद्यार्थ्यांना सुप्त कला-गुणांना वाव देण्यासाठी दिनांक १८ मे,२०२६ रोजी नागपूर येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आश्रमशाळेमधील २३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सदर अभ्यास दौऱ्यामध्ये Zero Miles ते खापरी दरम्यान मेट्रोने विद्यार्थ्यांनी प्रवास केला. मेट्रोने प्रथमत:च प्रवास करतांना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसांडून वाहत होता. या आनंदामध्ये काही विद्यार्थ्यांनी गोंडी नृत्यावर डान्स करुन आनंद साजरा केला तर काही विद्यार्थ्यांनी ड्रामाच्या माध्यमातून राणी दुर्गावती यांचे सादरीकरण केले. काही विद्यार्थ्यांनी धावत्या मेट्रोमध्ये क्रांतीसुर्य वीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे रांगोळीच्या स्वरुपात चित्र साकारले. तसेच काही विद्यार्थ्यांनी मेट्रोमध्ये मातीच्या कलाकृती, गोंडी चित्रे, बांबूपासून साहित्य तयार केले व उपस्थित अधिकारी यांचेसमोर तयार केलेल्या साहित्याचे सादरीकरण केले.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने श्री.विकास राचेलवार,



उपायुक्त, अपर आयुक्त, कार्यालय नागपूर श्री.अविनाश शिंदे,सहाय्यक आयुक्त, श्रीमती मयुरी शिंदे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी नागपूर व श्री.उमेश काशिद, प्रकल्प अधिकारी देवरी, डॉ.सायली चिखलीकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तसेच अधिकारी, मुख्याध्यापक, अधिक्षक व कर्मचारी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भेटून संवाद साधला.

यानंतर पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर येथे भेट देण्यात आली. भेटीमध्ये डॉ. श्री. रविंद्रकुमार सिंघल (भा.पो.से) पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडून विविध शस्त्रांबाबत माहिती देण्यात आली. तसेच कायदा व सुव्यवस्था संदर्भात विद्यार्थ्यांसोबत सविस्तर चर्चा करुन पोलीस विभागातील विविध पदाच्या नौकरी संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देवून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. तसेच IPS अधिकारी होण्याचे अनुषंगाने विद्यार्थ्यांना प्रेरित असे मार्गदर्शन केले.

यानंतर आश्रम शाळेतील २३० विद्यार्थ्यांना शहरी भागातील आधुनिक सोयी-सुविधांची प्रत्यक्ष ओळख व्हावी, या उद्देशाने नागपूर येथील 'व्हीआर मॉल' (VR Mall) येथे एका विशेष भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी मॉलमध्ये मांडण्यात आलेल्या विविध वस्तूंची प्रदर्शने पाहिली, तसेच 'गेम टाईम झोन'मधील विविध खेळांचा आनंद घेतला.

याप्रसंगी, सन्माननीय राज्यसभा खासदार श्रीमती मायाताई इवनाते आणि मा. श्री. परिणय फुके यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. परिनिता फुके यांनी सदर ठिकाणी भेट देत विद्यार्थ्यांसोबत गेम खेळणे, त्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंची पाहणी विद्यार्थ्यांचे एकपात्री नाट्य प्रयोग तसेच उन्हाळी शिबिरातील (समर कॅम्प) विविध उपक्रमांचा व कार्यप्रणालीचा आढावा घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः रेखाटलेली 'गोंडी चित्रे' आणि बांबूपासून तयार केलेल्या कलाकुसरीच्या वस्तू मान्यवर पाहुण्यांसमोर सादर केल्या व त्यांना भेट वस्तू म्हणून दिल्या. तद्नंतर त्यांनी विद्यार्थ्यांसोबत आईसक्रिमचा आस्वाद घेत संवाद साधला.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे विशेष कौतुक केले. यानंतर, विद्यार्थ्यांनी पाहुण्यांसमवेत आईस्क्रीमचा आस्वाद घेत या आनंददायी आणि माहितीपूर्ण भेटीची सांगता केली.

---

## आदई सर्कल येथील क्रिकेट थीम न हटवल्यास आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जीवनपटासाठी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल येथील आदई सर्कलला आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे नाव देण्यात आलेले असताना त्या ठिकाणी महानगरपालिकेकडून क्रिकेट थीम उभारण्यात आल्याने स्थानिक नागरिक व क्रांतिवीरप्रेमीत नाराजी व्यक्त होत आहे. सदर क्रिकेट थीम येत्या १५ दिवसांमध्ये हटवून त्या ठिकाणी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे स्मारक उभारण्यात यावे अन्यथा पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे एक लाक्षणिक उपोषण आदई सर्कल येथे करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक यांनी पत्राद्वारे दिली



आहे त्याबाबतचे पात्र देखील त्यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांना दिले आहे.आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हे भारतीय सशस्त्र क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जातात. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढा उभारणारे ते पहिले मोठे क्रांतिकारक होते. रायगड जिल्ह्यातील शिरढोण गावात त्यांचा जन्म झाला होता. इंग्रज सरकारच्या अन्यायकारक धोरणांविरोधात त्यांनी सामान्य जनता, रामोशी, कोळी, धनगर आणि इतर समाजघटकांना एकत्र करून स्वराज्यासाठी संघर्ष उभारला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य समर्पित केले. इंग्रज सरकारने त्यांना अटक करून एडन येथील तुरुंगात ठेवले, जिथे 17 फेब्रुवारी 1883 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या बलिदानामुळे पुढील अनेक क्रांतिकारकांना प्रेरणा मिळाली. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या माहितीपट चौकात लावण्याऐवजी दिलीप वेंगसकर क्रिकेट अकॅडमी ज्याचा काहीही उपयोग नाही अशांसाठी चौकात क्रिकेट थीम उभारणे म्हणजे महापुरुषांचा अवमान आहे तरी याबाबत येत्या १५ दिवसात जर का हि क्रिकेट थीम हटवून त्याठिकाणी आद्य क्रांतिवीर वासुदेवबालावंत फडके यांच्या जीवनावर आधारित थीम लावली गेली नाही तर आदई सर्कल येथे एकदिवस लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचे पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक यांनी पत्राद्वारे कळवले आहे.

---

## नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट; आमदार प्रशांत ठाकूर यांची समिटला सदिच्छा भेट आणि शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : नवीन मुंबई मधील यू बिझनेस मीट यांच्या वतीने आयोजित नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट २०२६ चे आयोजन करण्यात आले होते.भारत आणि थायलंड यांच्या दरम्यान व्यापार उद्योजकता वृद्धिंगत व्हावी या हेतूने या बेलापूरच्या दि पार्क हॉटेल मध्ये बिझनेस समिटचे आयोजन करण्यात आले होते. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी या समिटला सदिच्छा भेट देऊन आयोजकांना आगामी वाटचाली करता शुभेच्छा दिल्या तसेच थायलंड येथून आलेले PEITA सदस्य तथा माजी राजदूत थाराडोल थाँगग्रंग आणि पिटा सदस्य नरेन पियासच्चादेश यांना देखील शुभेच्छा दिल्या. या समिटमध्ये विविध व्यवसायिकांच्या पॅनल डिस्कशन साठी मॉडरेटर



म्हणून काम पाहणाऱ्या सुप्रसिद्ध पत्रकार महेश म्हात्रे आणि टाइम्स ऑफ इंडियाचे असिस्टंट एडिटर चित्तरंजन टेंभेकर यांचे देखील आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन केले. यू बिझनेस मिट चे फाउंडर वैभव सोनटक्के आणि को फाउंडर रवींद्र प्रताप गुप्ता,पत्रकार मंदार दोंदे, पत्रकार विवेक पाटील, समृद्धी वाणी यांच्या संकल्पनेतून नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते.

---

## मुदखेड रेल्वे स्टेशन डॉ. उपगुप्त महास्थवीर भंतेजी यांचे उत्साहात स्वागत



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:प्रकाश गवारे** : आंतरराष्ट्रीय स्तरावर धम्मकार्य करणारे पूज्य डॉ. उपगुप्त महास्थवीर भंतेजी हे व्हिएतनाम दौऱ्यासाठी हैदराबादकडे जात असताना देवगिरी एक्सप्रेसने मुदखेड रेल्वे स्थानकावर आगमन झाले. यावेळी मुदखेड येथील बौद्ध उपासकांनी त्यांचे उत्साहपूर्ण व श्रद्धाभावाने स्वागत केले.

भंतेजींच्या आगमनाची माहिती मिळताच स्थानकावर मोठ्या संख्येने धम्मप्रेमी उपस्थित होते. उपस्थित उपासकांनी पुष्पगुच्छ अर्पण करून भंतेजींना विनम्र वंदन केले व त्यांच्या पुढील व्हिएतनाम धम्मदौऱ्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी भंतेजींनी उपस्थितांना धम्म, करुणा, मैत्री आणि मानवतेचा संदेश देत समाजात शांतता व बंधुभाव टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. अल्प वेळाच्या भेटीतही उपासकांना भंतेजींचे मार्गदर्शन लाभल्याने उपस्थितांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

या स्वागत प्रसंगी पुज्य गगन बौध्दी भंतेजी मुदखेड परिसरातील सुनील चौदंते, देवराव चौदंते, बाळकृष्ण चौदंते, विनोद चौदंते,अनेक बौद्ध बांधव, युवक, तसेच धम्मप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## ऑनलाइन औषध विक्रीमुळे लहान व्यावसायिक धोक्यात – केमिस्ट असोसिएशनचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव शहरातील व तालुक्यातील ऑनलाइन औषध विक्री तात्काळ बंद करण्यात यावी तसेच औषध विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोयगाव तालुक्यात औषध विक्रेत्यांनी पुकारलेल्या एकदिवसीय बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.तालुक्यातील सर्व मेडिकल दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली होती.सोमवारी सकाळी ११ वाजता सोयगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने नायब तहसीलदार पत्रिके यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ऑनलाइन औषध विक्रीमुळे ग्रामीण भागातील छोट्या औषध विक्रेत्यांचे आर्थिक नुकसान होत असून ग्राहकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात



आले.यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष संजय शहापूरकर यांच्या नेतृत्वाखाली दिनेश पंडित,मंगेश सोहनी,नितीन चव्हाण,अनिकेत सोनवणे, मयुर राऊत,रवींद्र जाधव, परवेझ देशमुख,मंजूर पटेल, साद देशमुख,नावेद देशमुख, विकास मंडवे,गणेश पाटील, अमोल पाखरे,विनोद सोहनी, यांच्यासह तालुक्यातील अनेक औषध विक्रेते उपस्थित होते.औषध विक्रेत्यांनी सांगितले की,ऑनलाइन औषध विक्रीवर योग्य नियंत्रण नसल्यामुळे बनावट औषधे विक्रीचा धोका वाढत आहे. तसेच वैद्यकीय सल्ल्याविना औषधे सहज उपलब्ध होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.ग्रामीण भागातील लहान मेडिकल दुकानदारांवर उपासमारीची वेळ येत असून शासनाने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष द्यावे,अशी मागणी करण्यात आली. बंद दरम्यान तालुक्यातील बहुतांश मेडिकल दुकाने पूर्णपणे बंद होती.त्यामुळे बंदला मोठा प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले.प्रशासनाने निवेदन स्वीकारून शासनापर्यंत मागण्या पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

> **“ऑनलाइन औषध विक्रीमुळे ग्रामीण भागातील लहान मेडिकल व्यावसायिक अडचणीत आले आहेत. औषध हे सामान्य वस्तू नसून त्याचा थेट संबंध नागरिकांच्या आरोग्याशी आहे. ऑनलाइन पद्धतीमुळे अनेकदा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे उपलब्ध होत असल्याने भविष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात. शासनाने तात्काळ ऑनलाइन औषध विक्रीवर कठोर नियंत्रण आणावे व स्थानिक औषध विक्रेत्यांचे हित जपावे. आजच्या बंदला तालुक्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा आमच्या एकजुटीचा पुरावा आहे.”**
>
> **– संजय शहापूरकर, अध्यक्ष, सोयगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन.**

---

## पेरणी तोंडावर,डिझेलसाठी,प्रट्रोलंसाठी शेतकऱ्यांची धावपळ ; सरकारविरोधात तीव्र संताप ... अछे दिन केव्हा येणार ....?

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव शहरालगत असलेल्या साई पेट्रोल पंपावर मंगळवारी रात्रीपासून पेट्रोल आणि डिझेलसाठी वाहनधारक व शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.दुचाकी, चारचाकी तसेच ट्रॅक्टरधारकांनी इंधनासाठी तासनतास प्रतीक्षा केल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

संत गाडगे बाबा चौकापासून थेट पेट्रोल पंपापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसून आले.पेट्रोल पंपावर झालेल्या अचानक गर्दीमुळे पंप चालकांचीही मोठी तारांबळ उडाली. तालुक्यात इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याच्या चर्चेमुळे नागरिकांनी पेट्रोल-डिझेल साठवण्यासाठी



मोठी गर्दी केली होती. दरम्यान,पेरणीचे दिवस जवळ येत असल्याने शेतकऱ्यांची शेती मशागतीसाठी धावपळ सुरू झाली आहे. पूर्वी बैलजोडी आणि पारंपरिक साधनांनी शेती केली जात होती; मात्र आता आधुनिक युगात ट्रॅक्टरशिवाय शेती करणे अशक्य बनले आहे. त्यामुळे डिझेलशिवाय शेतीची कामे ठप्प होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.डिझेलचे वाढते दर आणि त्यात निर्माण झालेला तुटवडा यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. ट्रॅक्टर मालकांकडून “डिझेलची व्यवस्था करून ठेवा” असा स्पष्ट इशारा शेतकऱ्यांना दिला जात असल्याने अनेक शेतकरी हातात कॅन घेऊन पेट्रोल पंपावर रांगेत उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले. सर्वसामान्य जनता आणि शेतकरी रांगेत उभे राहून त्रास सहन करत असताना प्रशासन मात्र निवांत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. केंद्र सरकारकडून काटकसरीचा सल्ला दिला जात असताना तालुक्यातील अनेक शासकीय अधिकारी व कर्मचारी स्थानिक ठिकाणी न राहता दररोज दुचाकी आणि चारचाकी वाहनाने ये-जा करीत असल्याची चर्चा रंगली आहे. शासनाकडून विविध भत्ते आणि सुविधा घेऊनही इंधनाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.*“काटकसर फक्त सामान्य जनतेनेच करायची का?” असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता असताना देखील ग्रामीण भागातील इंधन प्रश्न सुटत नसल्याने सरकार आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.*सोयगावातील इंधन संकटामुळे भविष्यात शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या ये-जा व्यवस्थेवर काही निर्बंध येणार का? तसेच इंधन तुटवडा रोखण्यासाठी प्रशासन कोणती ठोस पावले उचलणार?याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

## अजिंठ्यात स्मशानभूमी विकासकामात अपहाराचा आरोप
## 'मीडिया अधिकार मंच'चे जिल्हा प्रशासनाला निवेदन ; आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील ऐतिहासिक व पर्यटन स्थळ असलेल्या अजिंठा गावातील पद्मवंशी तेली समाजाच्या 'गायमुख स्मशानभूमी'च्या विकासकामात शासकीय निधीचा कथित अपहार आणि प्रशासनाची दिशाभूल झाल्याची लेखी तक्रार 'मीडिया अधिकार मंच'चे प्रदेशाध्यक्ष श्याम झलवार यांनी जिल्हा प्रशासनाकडे पुराव्यांसह दाखल केली आहे. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तात्काळ कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दाखल तक्रार निवेदनात म्हटले आहे की, अजिंठा येथील पद्मवंशी तेली समाजाच्या स्मशानभूमी



विकासासाठी २७ जून २०२३ रोजीच्या मंजुरीनुसार, '२५/१५' शासकीय योजनेअंतर्गत डोंगरी भागातून ११ लाख ३२ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीतून पिकशेड, खुर्च्या, सिमेंट रस्ता व सुशोभीकरणाचे कार्य करणे बंधनकारक होते. परंतु, संबंधित यंत्रणेने प्रत्यक्ष जागेवर निकषानुसार काम न करता केवळ कागदोपत्री बोगस एस्टिमेट आणि एम.बी. (मोजमाप पुस्तिका) दाखवून शासनाची दिशाभूल केली व संपूर्ण ११ लाख ३२ हजार रुपयांचे बिल काढून फसवणूक केल्याचा आरोप झलवार यांनी केला आहे.

प्रत्यक्षात या ठिकाणी समाजाने स्वतः लोकवर्गणीतून सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे काम केले असून, याच कामाचा गैरफायदा घेत बांधकाम उपविभागीय अभियंता, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी आणि सरपंच यांनी संगनमताने हा कथित अपहार केल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. संबंधित उपविभागीय अभियंत्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन कोणतीही वस्तुनिष्ठ स्थळ पाहणी न करताच कार्यालयात बसून दिशाभूल करणारा बोगस अहवाल सादर केल्याचा गंभीर आक्षेपही निवेदनात नोंदवण्यात आला आहे.

> **"सदर कथित प्रकरण माझ्या कार्यकाळापूर्वीचे असून प्राथमिक रेकॉर्डनुसार या कामाची मोजमाप पुस्तिका पूर्ण झालेली आहे. तरीही, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दप्तरी नोंदींची रीतसर पडताळणी केली जाईल."**
>
> **— जयदीप सुरुशे (ग्रामविकास अधिकारी, अजिंठा)**

या प्रकरणाची लवकरात लवकर कायदेशीर चौकशी करून दोषींवर निलंबनाची कारवाई करावी, अन्यथा छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही 'मीडिया अधिकार मंच'चे प्रदेशाध्यक्ष श्याम झलवार यांनी दिला आहे.

# खारघरमध्ये दणक्यात पार पडला पाचवा परिणीता सन्मान – 2026

## विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव; 'अकोलेड स्क्रीनलेडी' मॅगझिन लोगोचे अनावरण

**दैनिक युवक आधार**

**खारघर प्रतिनिधी** : परिणीता सोशल फाऊंडेशन आयोजित पाचवा "परिणीता सन्मान – 2026" पुरस्कार सोहळा नुकताच नवी मुंबईतील खारघर येथील लिटिल वर्ल्ड मॉल मधील बॅंक्वेट हॉलमध्ये मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. महाराष्ट्रभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.




या कार्यक्रमाला पुणे येथील औटी ग्रुपचे चेअरमन बाबासाहेब औटी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच अमूल, टीआयपीएल, अल्ट्रा लुब, मधुराज बिल्डर्स, ईपीआर, अवधूत पिकवेल इंडस्ट्रीज आणि जव्हार इंडस्ट्रीज यांचेही सहकार्य लाभले.

कोरोना काळात महिलांना व्यवसायासाठी प्रोत्साहन आणि आधार देण्याच्या उद्देशाने परिणीता सोशल फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली. आज महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांमध्ये संस्थेचे कार्य विस्तारले असून ५० हजारांहून अधिक महिला सदस्य या संस्थेशी जोडल्या गेल्या आहेत.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध वृत्तनिवेदिका व चित्रपट निर्मात्या अमृता राव उपस्थित होत्या. दूरदर्शन आणि आकाशवाणीवरील त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीबरोबरच सामाजिक विषयांवरील चित्रपट निर्मितीतही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या "श्यामची आई" या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.





तसेच प्रसिद्ध इव्हेंट मॅनेजमेंट तज्ज्ञ मानसी इंगळे यांनीही कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावली. मराठी चित्रपट, मालिका आणि पुरस्कार सोहळ्यांच्या आयोजनामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.

यावेळी प्रसिद्ध वृत्तनिवेदक प्रशांत सागवेकर यांच्या संकल्पनेतून "अकोलेड स्क्रीनलेडी" या नव्या मराठी मॅगझिनच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. महिलाकेंद्री विविध विषयांवर आधारित हे मॅगझिन जून 2026 पासून वाचकांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या वर्षीचा परिणीता सन्मान विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना प्रदान करण्यात आला. यामध्ये समाजसेविका ममता सपकाळ, उद्योजिका डॉ. मंजिरी निरगुडकर-राव, प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शिका फुलवा खामकर, अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकर, "बरवा" ब्रँडच्या संचालिका कामाक्षी बर्वे, गझल गायिका डॉ. भाग्यश्री पांचाळे, आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. सुषमा पाटील, उद्योजिका मीरा बेरड, कॉस्मेटोलॉजिस्ट डॉ. निवेदिता मोरे, सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा कुरुप, रितिका किचनच्या संचालिका रितिका गायकवाड, हायकोर्ट वकील ॲड. संतोषी चव्हाण, ग्राफिक्स डिझायनर सुचेता अराणके, उद्योजिका वृषाली पाटील, योग प्रशिक्षिका शिल्पा कटरनवरे आणि बँक अधिकारी नमिता लोखंडे यांचा समावेश होता.

महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला उद्योजिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**दैनिक युवक आधार**

**नांदेड संभाजी सूर्यवंशी ग्रामीण तालुका प्रतिनिधी** : निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, भारतचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री. गणेशभाऊ कचकलवार सर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, नांदेड जिल्ह्याच्या वतीने नांदेड जिल्हा अध्यक्ष संभाजी सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली , मराठवाडा लोकसेवा मंडळ, नांदेड संचलित,

"नंदनवन कुष्ठधाम व प्रौढ मतिमंद मुलांची कृषी कार्यशाळा, नेरली, नांदेड"




येथे फळ वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.समाजातील दुर्लक्षित, वयोवृद्ध रुग्ण व मतिमंद मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी रुग्णांशी संवाद साधत त्यांना आत्मीयतेने फळांचे वाटप केले. यावेळी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे नांदेड जिल्हा अध्यक्ष संभाजी सुर्यवंशी, जिल्हा कार्याध्यक्ष देविदास एंगडे, जिल्हा संघटक गंगाधर कदम, नांदेड शहर प्रतिनिधी प्रदीपकुमार कांबळे तसेच पत्रकार यशवंत राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेचे मुख्य व्यवस्थापक श्री. पवार सर व संस्थेतील कर्मचारी वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमात सुमारे ३० ते ४५ वयोवृद्ध रुग्ण व मतिमंद मुलांना फळांचे वाटप करण्यात आले. मानवतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, वाढदिवसाचे औचित्य साधत समाजसेवेचा आदर्श निर्माण करण्यात आला.

# राज्यपालांची दिव्यांग व अनाथ मुलांच्या काष्ठ कलाकृती प्रदर्शनाला भेट

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : मतिमंद व अनाथ मुलांचे पालक शंकरबाबा पापळकर यांनी मुंबईत आयोजित केलेल्या काष्ठशिल्प कलाकृतींच्या प्रदर्शनाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज भेट दिली व दिव्यांग कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृतींचे अवलोकन केले. यावेळी राज्यपालांनी काष्ठ शिल्प कलाकारांशी संवाद साधला तसेच शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याचे कौतुक केले. शंकरबाबा पापळकर यांनी यावेळी राज्यपालांना विविध काष्ठशिल्पांच्या वैशिष्ट्याची माहिती दिली.

राज्यपालांच्या आगमन प्रसंगी शंकरबाबा पापळकर तसेच पु. ल. देशपांडे अकादमीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांनी राज्यपालांचे स्वागत केले. पद्मश्री शंकर बाबा पापळकर यांच्या



मार्गदर्शनाखाली स्व. अंबादास पंत वैद्य बेवारस दिव्यांग बालगृह, वझ्झर, जिल्हा अमरावती येथील अनाथ मुलांनी सागवान व बेल आदी लाकडापासून विविध काष्ठशिल्पे साकारली असून या कलाकृती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहे. काष्ठ कलाकृतींचे प्रदर्शन दिनांक 18 मे पर्यंत सर्वांसाठी खुले आहे. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कलादालनाच्या क्युरेटर वर्षा कारळे तसेच छायाचित्रकार शिरीष कारळे उपस्थित होते.

# मुरमाडी/सा . परिसरात गॅस सिलेंडर पुरवठा विस्कळीत ; ग्रामपंचायतीचे प्रशासनाला निवेदन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी** : तालुक्यातील मुरमाडी/सा. परिसरात घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा नियमित होत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामपंचायत मुरमाडी/सा. यांनी तहसील प्रशासनाकडे निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

ग्रामपंचायतीच्या निवेदनानुसार, संबंधित गॅस एजन्सीकडून वेळेवर सिलेंडर पुरवठा केला जात नसल्यामुळे अनेक कुटुंबांना वेळेवर गॅस उपलब्ध होत नाही. परिणामी, दैनंदिन स्वयंपाकासह इतर घरगुती कामांमध्ये अडचणी निर्माण होत असून नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. वारंवार एजन्सीशी संपर्क साधूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.

सदर निवेदन नायब तहसीलदार डि. ए. उरकुडकर यांना देण्यात आले असून पुरवठा विभागाचे निरीक्षक अधिकारी रोशन पी. कापसे यांनाही निवेदनाची प्रत सुपूर्द करण्यात आली.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच शेषराव धोंडूजी



वंजारी, उपसरपंच सौ. वनितताई अनिलजी शेंडे, माजी ग्रामपंचायत सदस्य अनिलजी शेंडे, पुरुषोत्तम बावनकुळे, आतिशजी झलके तसेच अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

मुरमाडी/सा. परिसरातील गॅस सिलेंडर पुरवठा नियमित व सुरळीत करण्यात यावा, तसेच नागरिकांना वेळेवर सेवा मिळावी यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# नागपूर जिल्ह्याचा वीजपुरवठा होतोय 'स्मार्ट' आणि 'हायटेक' !

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : नागपूर जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागातील वीज पायाभूत सुविधांचा कायापालट करण्यासाठी महावितरणने विकासकामांचा धडाका लावला असून, कोट्यवधी रुपयांच्या विविध लोकोपयोगी योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याला ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमल बजावणीमुळे जिल्ह्याचा वीजपुरवठा आता अधिक सक्षम आणि विनाखंड होणार आहे.

जिल्ह्यातील वीज वितरणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी महावितरण सध्या 322 कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी आराखडा राबवत असून, त्यापैकी 316 कोटींची कामे म्हणजेच तब्बल 98 टक्के कामे प्रगतीपथावर आहेत. यामध्ये सिडबी (SIDBI CDF) आणि विशेष सहाय्य योजनेचा मोठा वाटा आहे. विशेषतः नागपूरच्या दक्षिण-पश्चिम भागात ओव्हरहेड वीज तारांचे रूपांतर भूमिगत वाहिनीमध्ये करण्याचे 46 कोटींचे काम 100 टक्के पूर्ण झाले असून, यामुळे तांत्रिक बिघाड आणि पावसाळ्यातील संभाव्य अपघात पूर्णपणे टळणार आहेत. शेतकऱ्यांना दिवसा अखंड वीज देण्यासाठी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' (MSKVY 2.0) अंतर्गत मोठी कामे हाती घेण्यात आली आहेत. या योजनेसाठी नागपूर ग्रामीण मंडळाकरिता कार्यादेश देण्यात आला आहे. या अंतर्गत नवीन उपकेंद्रे उभारणी, अतिरिक्त रोहित्र बसवणे आणि क्षमता वाढवण्यावर भर दिला जात आहे. काटोल, उमरेड आणि सावनेर विभागांमधील अनेक उपकेंद्रांमध्ये अतिरिक्त रोहित्रांची कामे पूर्ण झाली असून ती कार्यान्वितही करण्यात आली आहेत. काटोलमधील डोरली आणि सावनेर एमआयडीसी येथे नवीन 33/11 केव्ही उपकेंद्रांची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

शहरी भागातही वीज यंत्रणा बळकट करण्यासाठी महाल, बुटीबोरी आणि सिव्हिल लाईन्स विभागात नवीन उपकेंद्रे उभारली जात आहेत. श्रीक्रष्ण नगर, मानेवाडा आणि बेसा येथील कामे यशस्वीरित्या कार्यान्वित झाली असून, मानकापूर येथील उपकेंद्राचे काम आता अंतिम टप्प्यात आहे. आरडीएसएस (RDSS) योजनेअंतर्गत वीज हानी कमी करण्यासाठी 482 नवीन वितरण रोहित्रांचे (HVDS) उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, त्यापैकी 440 रोहित्रे यशस्वीरित्या बसवून महावितरणने मोठे साध्य प्राप्त केले आहे. यासोबतच, वीज वाहिनी विलगीकरण योजनेसाठी 356.81 कोटींची कामे सुरू असून, याद्वारे 205 वाहिन्यांचे विलगीकरण आणि 1,599 नवीन रोहित्रे बसवण्याचे उद्दिष्ट आहे. महावितरणच्या या नियोजित आणि वेगवान कामांमुळे औद्योगिक क्षेत्राला, विशेषतः बुटीबोरी एमआयडीसीला विनाखंड वीजपुरवठा मिळण्यास मदत होत आहे. एकूणच, 33 केव्ही आणि 11 केव्हीच्या हजारो किलोमीटरच्या नवीन वाहिन्या आणि भूमिगत केबल्समुळे नागपूर जिल्हा ऊर्जा क्षेत्रात प्रगत आणि 'हायटेक' बनण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. महावितरणच्या या प्रभावी कामांमुळे केवळ ग्राहकांचा त्रास कमी होणार नाही, तर जिल्ह्याच्या आर्थिक आणि कृषी विकासालाही मोठी गती मिळणार आहे.

उपमुख्य जनसंपर्क
अधिकारी,
महावितरण, नागपूर

# जनगणना २०२७ मध्ये स्वतंत्र ओबीसी गणनेची मागणी; मुरमाडी/सा. ग्रामपंचायतीचे शासनाला ठोस निवेदन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी** : आगामी जनगणना २०२७ मध्ये इतर मागासवर्गीय (OBC) समाजाची स्वतंत्र नोंद करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी मुरमाडी/सा. ग्रामपंचायतीने शासनाकडे ठोस भूमिका मांडत निवेदन सादर केले आहे. ओबीसी समाजाची वास्तविक लोकसंख्या, सामाजिक व आर्थिक स्थिती समोर येण्यासाठी स्वतंत्र जनगणना अत्यावश्यक असल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले.

ग्रामपंचायतीतर्फे सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रमाणेच ओबीसी समाजाचीही स्वतंत्र व अधिकृत गणना करण्यात यावी. अनेक दशकांपासून ओबीसी समाजाची अचूक जनगणना न झाल्याने शासनाकडे ठोस आकडेवारी उपलब्ध नाही. परिणामी, शासकीय योजना, आरक्षण, शैक्षणिक सुविधा तसेच विकास निधीचे योग्य नियोजन करण्यात अडचणी निर्माण होत आहेत.

"ओबीसी समाजाची खरी लोकसंख्या समोर आली तरच सामाजिक न्यायाच्या धोरणांना बळ मिळेल आणि वंचित घटकांपर्यंत योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचेल," अशी भावना ग्रामपंचायतीने निवेदनातून व्यक्त केली आहे.

हे निवेदन नायब तहसीलदार डि. ए. उरकुडकर यांना सादर करण्यात आले. यावेळी सरपंच शेषराव धोंडूजी वंजारी, उपसरपंच सौ. वनितताई अनिलजी शेंडे, पुरुषोत्तमजी बावनकुळे, आतिशजी झलके, माजी ग्रामपंचायत सदस्य अनिलजी शेंडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुरमाडी/सा. ग्रामपंचायतीच्या या पुढाकाराचे परिसरात स्वागत होत असून, ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी ग्रामीण पातळीवरून उभा राहिलेला हा आवाज शासनाने गांभीर्याने घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# अंजनगाव सुर्जीमध्ये पाणीपुरवठा संकट : नागरिकांचा आक्रोश

## अनेक प्रभागांची सारखीच अवस्था, जनप्रतिनिधींची गाढवझोप !

**दैनिक युवक आधार**

**संतोषराव घोडेराव, तालुका प्रतिनिधि** : काठीपुरा परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत नसल्याने संतप्त नागरिकांनी आज जीवन प्राधिकरण कार्यालयावर धडक देत आंदोलन छेडले. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आणि कार्यालयाला कुलूप ठोकत आंदोलन केले.

नागरिकांनी आरोप केला की, जीवन प्राधिकरणाच्या उदासीनतेमुळे परिसरातील पाणीपुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. नागरिकांनी कार्यालयाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.




आंदोलनाच्या दबावामुळे जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रशासनाने चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.

नागरिकांनी इशारा दिला आहे की, पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन तीव्र केले जाईल. आंदोलनात परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# टँकरची कारला धडक, कारचे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : टँकरने कारला दिलेल्या धडकेत कारचे नुकसान झाले. या अपघाता प्रकरणी अवधेश कुमार रामसंबध मिश्रा या टँकर चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे 19 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

कृष्णा वाघे (राहणार लाडिवली) हे टाटा पंच गाडी क्रमांक एम एच ०६ डीए 5973 ने सामान खरेदी करण्यासाठी डी मार्ट, नवीन पनवेल या ठिकाणी जात होते.

यावेळी टँकर क्रमांक एम एच ०४ केएफ 3383 वरील चालकाने मद्य प्राशन करून टँकर भरधाव वेगाने चालवला आणि कृष्णा वाघे यांच्या कारला पाठीमागून उजव्या बाजूने धडक दिली. यावेळी कारच्या उजव्या बाजूच्या पाठीमागील दार चेपले गेले. तसेच पाठीमागील उजव्या बाजूचे टायर फुटला आणि मडगार्ड तुटून नुकसान झाले. हा अपघात दुपारी दोनच्या सुमारास कोन पोलिस चौकीसमोर पनवेल लेनवर घडला.

# पहिल्या नवी मुंबई ग्लोबल समिटची शानदार सांगता; यू बिझनेस मिट ने केले होते आयोजन

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : नवीन मुंबई मधील यू बिझनेस मीट यांच्या वतीने आयोजित नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील उद्योजकांनी उपस्थित रहात या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भारत आणि थायलंड यांच्या दरम्यान व्यापार उद्योजकता वृद्धिंगत व्हावी या हेतूने या बिझनेस समिटचे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि थायलंड या दोन देशातील व्यवसाय निष्णात प्रभुतींच्या चर्चांमधून अनेक नवनवीन उद्योजक आणि व्यापार संधी उदयास येण्याचे यामुळे चिन्ह निर्माण झाली आहेत.

विविध व्यवसाय आस्थापनांना व्यवसाय सुलभता प्रदान करण्याच्या हेतून यू बिझनेस मिट ही संस्था काम करत असते. फाउंडर वैभव सोनटक्के आणि को फाउंडर रवींद्र प्रताप गुप्ता,मंदार दोंदे, विवेक पाटील, समृद्धी वाणी यांच्या संकल्पनेतून नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि थायलंड यांच्यामध्ये द्विदेशीय व्यवसाय सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये एक्सपोर्ट इम्पोर्ट, मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री, फार्मसीटीकल्स, लाइफस्टाइल अँड हेल्थकेअर, बँकिंग, इन्शुरन्स, इंटरनॅशनल मीडिया, रिअल इस्टेट,हॉटेल अँड हॉस्पिटॅलिटी, टुरिझम अशा क्षेत्रातील तज्ञ मंडळींच्या पॅनल डिस्कशनचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध पत्रकार महेश म्हात्रे आणि टाइम्स ऑफ इंडियाचे असिस्टंट एडिटर चित्तरंजन टेंभेकर, सिटी बेल समूह संपादक मंदार दोंदे यांनी मॉडरेटर म्हणून या पॅनल डिस्कशन मध्ये उत्तमरित्या सुसंवाद घडवून आणला.



यू बिझनेस मिट यांच्या वतीने व्हर्च्युअल स्टुडिओ, मीटिंग रूम आणि एम ओ यू साईन करण्याकरता लीगल टीम देखील तैनात केली होती. अनेक उद्योजकांना या सुविधांचा लाभ झाला. बेलापूर येथील दि पार्क या तारांकित हॉटेलमध्ये सोमवार दिनांक 18 मे रोजी हे समिट संपन्न झाले.आमदार प्रशांत ठाकूर,निलेश म्हात्रे यांनी आवर्जून उपस्थित रहात नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. थायलंड येथून PEITA सदस्य तथा माजी राजदूत थाराडोल थाँगग्रंग आणि पिटा सदस्य नरेन पियासच्चादेश हे उपस्थित होते तर इंजीनियरिंग इन्स्टिट्यूट ऑफ थायलंडचे संचालक तथा PEITA चे सल्लागार प्रो. डॉ. चियांचुंग ओदि कलायांनामित्र, थायलंड पंतप्रधान कार्यालयातील फॉरेन अफेयर्स सचिव प्रसर्त पियासाचादेश, वर्ल्ड पीस फाउंडेशनच्या संस्थापिका पी.ओरावान हे ऑनलाइन माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधत होते.

एक्सपोर्ट इम्पोर्ट क्षेत्रामधील एक अग्रगण्य नाव असणारे ओमकार हरी माळी यांची चित्तरंजन टेंभेकर यांनी घेतलेली मुलाखत या समिटचे विशेष आकर्षण ठरली. तळोजा इंडस्ट्रियल इस्टेट चे अध्यक्ष सतीश शेट्टी यांची रवींद्र प्रताप गुप्ता यांनी घेतलेली मुलाखत देखील लक्षवेधी ठरली. ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स चे संस्थापक डॉक्टर संजय भिडे, ह्यूमन केअर वर्ल्ड वाईड चे डी एस चक्रवर्ती, गोमाता विजन चे विकास कोळी, यू के एस रिसॉर्ट चे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर संतोष पाटील, तेरणा हॉस्पिटलचे हेल्थकेअर ग्रोथ स्ट्रॅटेजिस्ट डॉक्टर मनीष राय, निवृत्त महासंचालक यशवंत ठाकरे, विभव इंटरनॅशनल कल्चरल अँड एज्युकेशनल फोरम चे दिलीप ठाणेकर,टेलेक्स चे जितेश पाटील आणि जयेश पाटील, प्लास्टिक सर्जन तथा कॉस्मेटोलॉजिस्ट डॉ शंकर सावंत यांनी ग्लोबल समिट आयोजनामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

यु बिझनेस मीट चे फाउंडर आणि एन्जॉय को वर्किंग स्पेस, वेब प्रिंट सोल्युशन्स या संस्थांचे संचालक असणारे वैभव सोनटक्के यांनी या समिटच्या आयोजनासाठी अथक परिश्रम घेतले. तर या ग्लोबल बिझनेस समिट चे आयोजनात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर समन्वय साधत अतुलनीय कामगिरी करणाऱ्या समृद्धी वाणी यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.

# लाखनीला लाभलेला शैक्षणिक धुरंधर

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : खूप कमी व्यक्ती आढळतात समाजामध्ये जे त्यांच्या लहानपणापासून ते मोठेपणापर्यंतच्या प्रत्येक घडामोडीतून शिकतात आणि समाजामध्ये आवश्यक तो बदल घडवून आणायचा प्रयत्न करतात. अशाच एका लाखनीच्या धुरंदराची कहाणी, म्हणजे आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग चे संचालक श्री निहाल जी वालदे सर यांची. लहानपणीचे शिक्षण लाखनी मध्ये झाल्यानंतर बाहेर उच्च शिक्षणासाठी म्हणजेच इंजीनियरिंगच्या शिक्षणासाठी जाऊन तिथे सुवर्णपदकाचे मानकरी ठरवून लाखनी तालुक्याचा नाव उजागर केल्यानंतर, भरपूर कौशल्यामध्ये जसे वैयक्तिक समुपदेशन, व्यक्तिमत्व विकास, शैक्षणिक प्रशिक्षक, इंग्लिश स्पिकिंग ट्रेनर, इत्यादीमध्ये पारंगत झाल्यानंतर भरपूर सरकारी नोकऱ्या फेटाळून समाजाविषयी बांधिलकी आणि समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या एक उंच पातळीवर नेण्याचा ध्यास आणि निश्चय बाळगून ते लाखनीमध्ये परतले. लगेच कोरोना काळ आल्यामुळे त्यांचे हे ध्येय काही वर्ष पुढे ओलांडलं. पण निहाल सर थांबले नाही ते ऑनलाईन माध्यमातून वैयक्तिक समुपदेशन करायचे इंग्लिश स्पिकिंग ट्रेनिंग द्यायचे आणि सोबतच वेगवेगळ्या शैक्षणिक प्रशिक्षणे सुद्धा द्यायचे. वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन ते सेमिनार घ्यायचे. कोरोना काळ संपल्यानंतर लगेच त्यांनी एक असा पाऊल उचलला ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी जनु एक सुवर्णसंधी निर्माण झाली ती म्हणजे त्यांचा सर्वांगीण विकास म्हणजेच एकंदरीत बघायला गेलं तर संपूर्ण सामान्य विद्यार्थ्यांना घडवण्याचा एक मात्र प्लॅटफॉर्म तो म्हणजे आर्टस ऑफ लाइफ कोचिंग ट्रेनिंग एज्युकेशन नाव्या रूपाने आलेली शैक्षणिक कोचिंग क्लासेस. या शैक्षणिक कोचिंग क्लासेस मध्ये फक्त विषयांवरच नाही तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पण भर दिला जाते. श्री निहाल वालदे सर यांच म्हणणं असं आहे की विद्यार्थ्यांना जर घडवायचं असेल तर या कोचिंग चा भाग बनाव अन्यथा इतरत्र कुठेही शिकवावं. आज आम्ही सर्वांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार केला तर अशाच कुठल्यातरी शैक्षणिक संस्थेची गरज आहे. लाखनी तालुक्यामध्ये भरपूर गोरगरीब विद्यार्थी आहेत म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करून निहाल वालदे सरांनी या कोचिंग क्लासेसचा पाया रचला.




या कोचिंगला चार वर्षे पूर्ण झालेली आहेत. तळागाळातील ज्या विद्यार्थ्यांना काही शैक्षणिक क्षेत्रातल येत नाही अशा विद्यार्थ्यांना मोलाच ज्ञान देऊन त्यांना उच्च स्तर देण्याचं आणि त्यांना त्यांच्या शाळेमध्ये प्रथम क्रमांक पटकवण्या इतक योग्य बनवण्याचा प्रयत्न सातत्याने आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग करत आहे. लाखनी तालुक्यातील प्रत्येक पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी निश्चितच या कोचिंग चा लाभ घेतला पाहिजे आणि श्री.निहाल वालोदे सरांच्या दूरदृष्टीच्या या निश्चयाला नक्की साथ दिली पाहिजे. दरवर्षी समर ट्रेनिंग किंवा समर कॅम्प या नावाने निहाल सर प्रत्येक विद्यार्थ्याला भविष्यामध्ये अति आवश्यक असणारे प्रशिक्षण वेगवेगळ्या प्रशिक्षकांमार्फत देण्याचा प्रयत्न करतात. त्या समर ट्रेनिंग च नाव म्हणजे भविष्य समोर ट्रेनिंग 2.0. या ट्रेनिंग मध्ये नेहमी निहाल सर स्वतःची ट्रेनिंग म्हणजेच इंग्लिश स्पिकिंग ची ट्रेनिंग मोफत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देतात. ज्यांना असं वाटते की आपल्याला सुद्धा इंग्रजी बोलता आली पाहिजे त्यांनी नक्कीच निहाल वालदे सरांकडून मार्गदर्शन घ्यावे. पिढ्या ओलांडून जातात पण समाजामध्ये खूप कमी लोक असे असतात जे समाजाचा विचार करून उभे होतात ताठ मानेने सर्व गोष्टी करायचा प्रयत्न करतात आणि समाजाने सुद्धा अशा व्यक्तींना जर साथ दिली तर नक्कीच हे धुरंदर व्यक्ती समाजाला नक्कीच योग्य ठरतात. श्री निहाल वालदे सरांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

# सोयगाव पंचायत समितीत नवनियुक्त ABDO अमोल जगताप यांचे जंगी स्वागत

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव पंचायत समिती सोयगाव येथे नवनियुक्त सहायक गटविकास अधिकारी (ABDO) मा. अमोल जगताप यांचे पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण व सौ.तेजस्विनी काळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अमोल जगताप यांना पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा देत, त्यांच्या नेतृत्वाखाली सोयगाव तालुक्यातील विकासकामांना अधिक गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला.



याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी “नेतृत्व आणि प्रशासन एकत्र आल्यावर विकासाला नवी दिशा मिळते,”असे सांगत पंचायत समितीच्या माध्यमातून जनतेच्या हिताची कामे अधिक प्रभावीपणे राबवली जातील,असा आशावाद व्यक्त केला. या स्वागत समारंभाला पंचायत समितीचे माजी सभापती बद्री राठोड,जिल्हा सरचिटणीस सुनील गावंडे, रवींद्र पाटील,मयूर मनगटे,गजानन शिंदे, सीताराम जाधव,संभाजी पवार, नाना शिंदे, विजय गव्हाड तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सव्वा महिन्याच्या बाळाची जबाबदारी सांभाळत प्रतिक्षा श्रीवास्तव यांची 99.63 पर्सेंटाइलची झेप”

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र राज्याच्या नुकत्याच संपन्न झालेल्या एम.एड प्रवेश पात्रता परीक्षेत लासलगाव (ता. निफाड) येथील प्रतिक्षा श्रीवास्तव यांनी 99.63 टक्के इतके विक्रमी पर्सेंटाइल गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे शैक्षणिक क्षेत्रात तसेच परिसरात त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



विशेष म्हणजे, अवघ्या सव्वा महिन्याच्या बाळाला आजी-आजोबांच्या स्वाधीन करून त्यांनी परीक्षेसाठी हजेरी लावली होती. मातृत्वाची जबाबदारी आणि अभ्यास यांचा समतोल साधत त्यांनी हे यश मिळविल्याने त्यांच्या जिद्दीचे आणि चिकाटीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी अभ्यासाची सातत्याने तयारी सुरू ठेवली आणि त्यातूनच हे यशाचे एव्हरेस्ट सर केले.

प्रतिक्षा श्रीवास्तव यांनी यापूर्वी देखील बी.एड प्रवेश पात्रता परीक्षेत राज्यात प्रथम येण्याचा मान पटकावला होता. आता एम.एड प्रवेश पात्रता परीक्षेतही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, मित्रपरिवार तसेच नातेवाईकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणास्थान ठरत आहेत. मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे प्रतिक्षा श्रीवास्तव यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे.

# रायगडात शासकीय दुखवट्याच्या दिवशी ५० लाखांचा टेंडर ; प्रशासनावर भ्रष्टाचाराचा भडकता संशय


**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी** : राज्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनानिमित्त जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसीय शासकीय दुखवट्याच्या दुसऱ्या दिवशीच (२८ जानेवारी २०२६) रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने तब्बल ५० लाख रुपयांचे किचन सेटसाठी ई-टेंडर प्रसिद्ध केल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. या घडामोडींचा मागोवा घेत सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक हे प्रकार गंभीर संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे म्हणत आहेत आणि तत्कालीन उच्चस्तरीय चौकशीची मागणी करत आहेत.सामाजीक कार्यकर्ते संजय सावंत यांनी या प्रकरणाचे भांडाफोड करत म्हटले आहे की, राज्य सरकारकडून सर्व शासकीय कार्यालयांना सुट्टी जाहीर केलेल्या त्या दिवशी देखील हा टेंडर का आणि कोणाच्या आदेशाने प्रसिद्ध केला गेला याबाबत उत्तर हवे. "साध्या प्रशासनिक प्रक्रियेप्रमाणे नसलेली घाई आणि पारदर्शकतेचा अभाव स्पष्ट दिसतो," सावंत म्हणाले.

टेंडर प्रक्रियेतील अनियमितता तारखेची साखळी

प्राथमिक टेंडर ५ जानेवारी २०२६ रोजी काढण्यात आला; परंतु तो अचानक रद्द करण्यात आला.दुसरा टेंडर १३ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झाला; तोही अज्ञात कारणाने रद्द झाला. नंतर २८ जानेवारी २०२६ रोजी, राज्यात शासकीय दुखवटा असताना तिसरा टेंडर पुन्हा गाजला हा पैलू अनेकांना संशयी बनवतो.आर्थिक हितसंबंधांचा संशय आणि ठेकेदारांचे नाव

प्रकरणात मानसी डुकरे या व्यक्तीच्या माध्यमातून व्यवहार चालल्याची चर्चा सुरू आहे. लोकांच्या चर्चा आणि प्रशासनाच्या वर्तुळातील गुप्त माहिती यावरून हे स्पष्ट होते की या व्यवहारामागे मोठे आर्थिक स्वार्थ असू शकतात, असा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.अलीकडील खरेदी का पुन्हा टेंडर?



अधिक धक्कादायक बाब म्हणजे, महिला व बालकल्याण विभागाने अलीकडेच तब्बल सुमारे ५ कोटी रुपयांचे किचन सेट खरेदी केले होते (अंदाजे २ कोटी + ३ कोटी पूर्वीच्या खरेदी).

इतक्या मोठ्या कालावधीत आणि रकमेमध्ये खरेदी झाल्यानंतरही ५० लाखांचे नवीन टेंडर का? हा प्रश्नही स्थानिक जनतेत आणि सामाजिक कार्यकर्त्यांत तळमळीने उपस्थित केला जात आहे.उत्सर्जित साहित्य आणि बाजारभावापेक्षा जास्त दर?

पूर्वी खरेदी झालेल्या किचन सेट साहित्याच्या निकृष्ट दर्जाबद्दल नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते तक्रारदार आहेत. तसेच ते म्हणतात की काही खरेदी बाजारभावापेक्षा खूपच जास्त दराने करण्यात आल्या, ज्यामुळे शासनाची आर्थिक फसवणूक झाली असण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. त्यामुळे या सर्व खरेदी-टेंडर प्रक्रियेची स्वतंत्र तज्ज्ञ समितीद्वारे तपासणी व्हावी अशी मागणी वाढली आहे.

## महिला व बालकल्याण खात्याच्या टेंडरवर भ्रष्टाचाराचा संशय; सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक ACB तपासणीची मागणी करत आहेत

अधिकारी-ठेकेदार साजिशी असल्याचा आरोप

स्थानीय सूत्रांनुसार अधिकारी आणि ठराविक ठेकेदार यांच्यात सगंधमत असल्याचे आरोप जोर धरत आहेत.

नियमांमध्ये फेरफार करुन निवडक ठेकेदारांना फायदा देण्याच्या पद्धती अमलात आल्या असाव्यात, असा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणातील प्रत्येक टप्प्याचे लेखी नोंदी, ई-प्रक्रियेचे लॉग आणि निर्णय कोणत्या अधिकार्यांच्या हस्ते झाले हे उघड करावे, अशी मागणी केली जात आहे.

***मागणी***

मंत्री आदिती तटकरे आणि ACB चौकशी

सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे या प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय, स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि त्यांच्या निकटवर्तीयांच्या आर्थिक व्यवहारांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (ACB) चौकशी व्हावी, अशी विनंतीही त्यांनी केली.

प्रशासनाचा पाठपुरावा काय?

या प्रकरणामुळे रायगड जिल्हा परिषदेतील प्रशासकीय कारभार आणि शासकीय खरेदी प्रक्रियेवरील विश्वास पुन्हा प्रश्नांत आला आहे. स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षीय नेते आता राज्य शासन आणि वरिष्ठ प्रशासनाकडून ताबडतोब निष्पक्ष चौकशी आणि जवाबदारीची मागणी करत आहेत.

रायगडचे लक्ष आता या प्रकरणाकडे लागले असून, सरकार काय पाऊल उचलेल हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल.काय अपेक्षित आहे

तातडीची उच्चस्तरीय प्रशासनिक चौकशी.

सर्व संबंधित कागदपत्रे, ई-टेंडर लॉग आणि निर्णयप्रक्रियेचे सार्वजनिक प्रकाशन.

निकृष्ट दर्ज्याच्या वस्तूंची स्वतंत्र तांत्रिक तपासणी.

गरज भासल्यास ACB मार्फत आर्थिक व्यवहारांची चौकशी.

# दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाज : काळाची गरज

२१ मे हा दिवस भारतामध्ये 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' म्हणून पाळला जातो. हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी घटनेची आठवण करून देणारा आहे. भारताचे माजी पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमधील श्रीपेरंबुदूर येथे निवडणूक प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता. त्या घटनेनंतर भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचा उद्देश केवळ एका नेत्याच्या स्मृतींना अभिवादन करणे नाही, तर समाजामध्ये शांतता, बंधुता, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. आजच्या अस्थिर आणि तणावपूर्ण जगात या दिवसाचे महत्त्व अधिक वाढलेले दिसून येते.

मानव जातीच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता संघर्ष, युद्धे आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ आढळतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे केली जात होती. मध्ययुगात धर्माच्या नावाखाली रक्तपात झाला. आधुनिक युगात राष्ट्रवाद, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, धार्मिक कट्टरता आणि जातीयवादामुळे हिंसाचाराला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जगाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले असले, तरी मानवी मनातील द्वेष, सूडभावना आणि असहिष्णुता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे दहशतवाद अधिक संघटित, आक्रमक आणि घातक बनला आहे. आज दहशतवादी संघटना इंटरनेट, सोशल मीडिया, आर्थिक नेटवर्क आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या मदतीने जगभरात भयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ एका देशापुरता मर्यादित प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजातीसमोरील गंभीर आव्हान बनला आहे.

दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसा, धमकी आणि भीतीचा वापर करणे होय. दहशतवादी संघटना समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. हिंसाचार ही केवळ शारीरिक हानीपुरती मर्यादित गोष्ट नाही. मानसिक, सामाजिक आणि वैचारिक स्तरावरही हिंसा घडू शकते. एखाद्याला धमकावणे, द्वेष पसरवणे, अफवा निर्माण करणे किंवा समाजात भीतीचे वातावरण तयार करणे हे देखील हिंसेचेच प्रकार आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न नसून तो सामाजिक, मानसिक आणि नैतिक मूल्यांशी संबंधित गंभीर विषय आहे.

भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, काही विघातक शक्तींनी या विविधतेचा गैरफायदा घेऊन देशामध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक दहशतवादी घटनांचा सामना केला आहे. पंजाबमधील अतिरेकी चळवळी, जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, ईशान्य भारतातील फुटीरतावादी कारवाया, नक्षलवाद आणि महानगरांमधील बॉम्बस्फोट अशा अनेक घटनांनी देश हादरून गेला. १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट, २००१ मधील भारतीय संसदेवरील हल्ला, २००८ मधील मुंबईवरील २६/११ चा दहशतवादी हल्ला आणि पुलवामा हल्ला अशा घटनांमध्ये शेकडो निरपराध नागरिक, सैनिक आणि पोलिस शहीद झाले. या घटनांमुळे समाजामध्ये भीती, असुरक्षितता आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

दहशतवादाची कारणे अनेक प्रकारची आहेत. गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, सामाजिक अन्याय, धार्मिक कट्टरता, जातीय भेदभाव, राजकीय अस्थिरता आणि परकीय हस्तक्षेप ही दहशतवाद वाढण्याची प्रमुख कारणे मानली जातात. समाजातील काही युवक जेव्हा स्वतःला उपेक्षित समजू लागतात, तेव्हा त्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण होतो. काही अतिरेकी संघटना अशा युवकांना चुकीच्या मार्गाला लावतात. धर्म, राष्ट्रवाद किंवा स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. काही वेळा आर्थिक आमिष दाखवूनही युवकांना दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी केले जाते. सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून अतिरेकी विचारसरणीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे युवकांमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्ये विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.

हिंसाचाराचा परिणाम अत्यंत भयावह असतो. दहशतवादी हल्ल्यांमध्ये निरपराध लोकांचे प्राण जातात, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि हजारो लोक मानसिक आघात सहन करतात. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू म्हणजे त्या संपूर्ण कुटुंबाचा आधार हरवणे होय. लहान मुले अनाथ होतात, महिलांचे संसार उद्ध्वस्त होतात आणि वृद्ध व्यक्ती आधारविना राहतात. हिंसेमुळे समाजामध्ये भीती आणि अविश्वास वाढतो. लोक सार्वजनिक ठिकाणी जाण्यास घाबरतात. शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, रेल्वे स्थानके आणि धार्मिक स्थळे असुरक्षित वाटू लागतात. दहशतवादी घटनांचा मानसिक परिणामही गंभीर असतो. अनेक लोकांना दीर्घकाळ तणाव, नैराश्य आणि भीतीचा सामना करावा लागतो.

दहशतवादाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होतो. एखाद्या मोठ्या हल्ल्यानंतर पर्यटन, उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक यांवर विपरीत परिणाम होतो. सरकारला सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. विकासकामांसाठी वापरला जाणारा निधी सुरक्षेसाठी खर्च होतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मंदावतो. दहशतवादी घटनांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा प्रभावित होऊ शकते. त्यामुळे दहशतवाद हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय विकासासाठीही मोठे आव्हान आहे.



आजच्या डिजिटल युगात सायबर दहशतवाद हे नवे संकट बनले आहे. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी यंत्रणा, बँकिंग व्यवस्था आणि संप्रेषण प्रणालीवर हल्ले केले जाऊ शकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरवणे, धार्मिक तेढ निर्माण करणे आणि समाजात अस्थिरता निर्माण करणे हे प्रकार वाढले आहेत. काही वेळा खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण संदेशांमुळे दंगली आणि हिंसाचार भडकतो. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती तपासल्याशिवाय पुढे पाठवू नये. डिजिटल साक्षरता ही आजच्या काळाची गरज बनली आहे.

दहशतवाद आणि हिंसाचार रोखण्यासाठी शिक्षण अत्यंत प्रभावी माध्यम ठरू शकते. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच शांतता, सहिष्णुता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. शिक्षणामुळे विवेकशीलता विकसित होते आणि युवक चुकीच्या प्रवृत्तीं पासून दूर राहतात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, मानवता आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारित उपक्रम राबविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी विविध धर्म, संस्कृती आणि विचारांचा आदर करण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे.

भारत देशात महात्मा गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला अहिंसेचा महान संदेश दिला. सत्य, प्रेम आणि शांततेच्या माध्यमातून संघर्ष सोडविण्याचा मार्ग त्यांनी दाखवून दिला. गांधीजींच्या मते हिंसा तात्पुरता विजय मिळवून देऊ शकते; परंतु दीर्घकालीन शांतता आणि मानवतेचे रक्षण केवळ अहिंसेतूनच शक्य आहे. आजच्या काळात गांधीजींचे विचार अधिक महत्त्वाचे वाटतात. हिंसेला हिंसेने उत्तर दिल्यास द्वेष वाढतो; परंतु संवाद, सहकार्य आणि समजूतदारपणातून समाजात सलोखा निर्माण होतो.

कुटुंब व्यवस्थेची भूमिकाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुलांमध्ये नैतिक मूल्ये, सहनशीलता, परस्पर आदर आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य कुटुंबातूनच सुरू होते. पालकांनी मुलांच्या वर्तनाकडे लक्ष देणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. आज अनेक युवक सोशल मीडियाच्या प्रभावाखाली येतात. चुकीच्या विचारसरणीचा प्रभाव पडू नये यासाठी कुटुंबातील वातावरण सकारात्मक असणे गरजेचे आहे. युवकांना योग्य दिशा मिळाली तर ते राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाचे योगदान देऊ शकतात.

माध्यमांची जबाबदारी देखील अत्यंत महत्त्वाची आहे. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सोशल मीडिया यांच्या माध्यमातून समाजात जागरूकता निर्माण करता येते. मात्र, काही वेळा सनसनाटी वृत्तांकनामुळे समाजात भीती आणि तणाव वाढतो. त्यामुळे माध्यमांनी जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने बातम्या सादर करणे आवश्यक आहे. समाजात शांतता, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचविणे ही माध्यमांची सामाजिक जबाबदारी आहे.भारत सरकार आणि विविध सुरक्षा यंत्रणा दहशतवाद रोखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. सैन्यदल, पोलिस, गुप्तचर संस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा देशाच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कार्यरत असतात. सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा मजबूत करण्यात आली आहे. दहशतवादी कारवायांवर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर कायदे करण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरही विविध देश एकत्र येऊन दहशतवादाविरोधात सहकार्य करत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने दहशतवादाला जागतिक शांततेसाठी गंभीर धोका मानले आहे.धर्म हा मुळात प्रेम, करुणा आणि मानवतेचा संदेश देतो. कोणताही धर्म हिंसा शिकवत नाही. परंतु काही कट्टरवादी शक्ती धर्माचा चुकीचा अर्थ लावून लोकांना भडकवतात. त्यामुळे धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. विविध धर्मांचे लोक एकत्र येऊन शांतता आणि बंधुभावाचा संदेश देतील, तर समाज अधिक मजबूत होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाने सर्व धर्मांना समान आदर दिला आहे. 'सर्वधर्मसमभाव' ही भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. या मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.शाळा आणि महा विद्यालयांमध्ये दहशतवादविरोधी शपथ, व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, रॅली आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव आणि शांततेची भावना निर्माण होते. युवकांनी संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवून शांततेच्या मार्गाने समस्या सोडविण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. युवक हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्यामध्ये अपार ऊर्जा आणि क्षमता आहे. ही ऊर्जा सकारात्मक दिशेने वळविणे अत्यंत आवश्यक आहे.

महिलांची भूमिकाही शांतता प्रस्थापित करण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. आई, शिक्षिका, समाजकार्यकर्त्या आणि नेतृत्वकर्त्या म्हणून महिला समाजात संवेदनशीलता आणि सहकार्याची भावना निर्माण करू शकतात. अनेक महिलांनी समाजात शांतता मोहिमा राबवून सकारात्मक परिवर्तन घडवून आणले आहे. महिलांना शिक्षण, स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग मिळाल्यास समाज अधिक स्थिर आणि प्रगत होतो.

भारतीय संस्कृतीने जगाला 'वसुधैव कुटुंबकम्'चा संदेश दिला आहे. संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे, ही भावना भारतीय तत्त्वज्ञानात आढळते. प्रेम, करुणा, सहिष्णुता आणि मानवता हीच खरी संस्कृती आहे. हिंसा आणि द्वेष यातून केवळ विनाश निर्माण होतो; तर शांतता आणि सहकार्य यातून प्रगतीचा मार्ग खुला होतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने समाजात शांतता टिकवून ठेवण्यासाठी योगदान दिले पाहिजे.दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी दिन हा केवळ औपचारिकता म्हणून साजरा करण्याचा दिवस नाही. हा दिवस आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण समाजात शांतता आणि बंधुभाव वाढविण्यासाठी काय योगदान देत आहोत, याचा विचार या निमित्ताने करणे आवश्यक आहे. हिंसा ही समस्या सोडविण्याचा मार्ग नाही, हे समाजाने समजून घेतले पाहिजे. मतभेद असू शकतात; परंतु ते संवाद, लोकशाही आणि संविधानिक मार्गाने सोडविले पाहिजेत.

आज जगासमोर शांततेचे मोठे आव्हान उभे आहे. युद्धे, धार्मिक संघर्ष, जातीय हिंसा, दहशतवाद आणि सायबर गुन्हे यांमुळे मानवता धोक्यात आली आहे. अशा परिस्थितीत जागतिक बंधुभाव, सहकार्य आणि शांततेची भावना अधिक मजबूत करण्याची गरज आहे. विविध देशांनी परस्पर सहकार्याने दहशतवादाविरोधात एकत्रित लढा दिला पाहिजे. मात्र, खरी शांतता तेव्हाच निर्माण होईल जेव्हा प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये मानवतेबद्दल आदर आणि प्रेम निर्माण होईल.


दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी नागरिकांनीही सतर्क राहणे आवश्यक आहे. संशयास्पद हालचालींबाबत प्रशासनाला माहिती देणे, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन करणे आणि समाजात सलोखा टिकवून ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. देशभक्ती म्हणजे केवळ घोषणाबाजी नसून समाजात शांतता, एकता आणि सद्भावना टिकवून ठेवणे होय.

भारत हा शांतता, लोकशाही आणि सहिष्णुतेवर विश्वास ठेवणारा देश आहे. अनेक संकटांनंतरही भारताने लोकशाही आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवली आहे. हे भारतीय समाजाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. विविधतेत एकता जपणारा भारत जगासाठी आदर्श ठरू शकतो. मात्र, त्यासाठी समाजातील द्वेष, असहिष्णुता आणि हिंसक प्रवृत्ती दूर करणे आवश्यक आहे.२१ मे रोजी साजरा होणारा दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन आपल्याला शांततेचा, मानवतेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतो. या दिवशी आपण सर्वांनी हिंसेचा त्याग करून प्रेम, सहकार्य आणि बंधुभावाचा मार्ग स्वीकारण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. शिक्षण, सामाजिक न्याय, आर्थिक विकास, नैतिक मूल्ये आणि मानवतेच्या माध्यमातूनच दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाजाची निर्मिती शक्य आहे. अहिंसा, सत्य, बंधुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समृद्ध होऊ शकतो. त्यामुळे दहशतवाद आणि हिंसाचाराविरोधात एकजुटीने उभे राहून शांततामय, सुरक्षित आणि सुसंस्कृत भारत घडविणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आज २१ मे, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा आज ३५ वा स्मृतीदिन. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते. राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता. ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान



पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. राजीव गांधी जेंव्हा संगणकावर बोलत होते तेंव्हा अनेकजण त्यांच्यावर टीका करत होते. पण संगणक क्रांती आणणार हा ध्यास त्यांनी घेतला होता. राजीव गांधींमुळेच सर्वसामान्य घरात संगणक पोहचला. राजीव गांधी यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे ८ टक्के म्हणजे तेरा लक्ष कोटींचा माहिती तंत्रज्ञान उद्योग उभा राहिला. यातून पन्नास लाख लोकांना थेट रोजगार मिळतो आहे. माहिती प्रधान सभ्यता, ज्ञान प्रधान सभ्यता, बुद्धिमत्ता प्रधान सभ्यता या तीन क्रांतीची पायाभरणी राजीव गांधी यांनी केली. त्याचीच फळे आज भारत देश चाखतो आहे. राजीव गांधी यांच्या दुरदृष्टीमुळे भारताचा वेगाने विकास झाला आणि लोकांचे जीवनमान उंचावले. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात. राजीव गांधी यांनी दूरसंचार क्रांती बरोबरच नवे शैक्षणिक धोरण आणून देशभरात नवोदय विद्यालयाची स्थापना केली. त्यासोबतच पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांना राजकारणात मोठी संधी दिली. राजीवजींनी घेतलेले हे निर्णय भारताच्या जडणघडणीत आणि विकासात मैलाचा दगड ठरले आहेत. भारत देशाला राजीव गांधी यांनी तंत्र वैज्ञानिक दृष्टी दिली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महाशक्ती बनवून भारताला स्वाभिमान दिला. पुढच्या पन्नास वर्षाचा अर्थव्यवस्थेचा पाया राजीव गांधी यांनी त्यावेळेला रचला होता त्यामुळेच आपण आज इथपर्यंत पोहचू शकलो. देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून आजचा दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**

# भाजप, भिवंडी महानगरपालिकेत सेक्युलर फ्रंटला मदत करण्याचे काम करत आहे - शिवसेना नगरसेवक : मनोज काटेकर

**भिवंडी,** : महाराष्ट्र मध्ये भाजप व शिंदे गटाच्या नेत्यांमधील घटना पाहता आता,भिवंडी महानगरपालिका निवडणूक एकत्र लढवलेल्या भाजप आणि शिंदेसेना नगरसेवकांमध्येही शीतयुद्ध सुरू झाले आहे. स्थायी समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकी दरम्यान, भाजपचे गट नेते संतोष शेट्टी यांनी सांगितले की, त्यांच्याशी कोणीही संपर्क साधला नाही.तर माजी उपमहापौर आणि शिंदेसेना महानगरपालिकेतील गटनेता



मनोज काटेकर यांनी आरोप केला की,भाजप ही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) यांची आघाडी आहे.

महापौर निवडणुकीपासून धर्मनिरपेक्ष आघाडीसोबत स्थायी समितीच्या निवडणुका भाजप सदस्यांच्या अनुपस्थितीवरून हे स्पष्ट होते.स्थायी समितीच्या निवडणुकीत भाजप सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे शिंदेसेना उमेदवाराचा पराभव झाला, जो थेट सेक्युलर फ्रंटचा फायदा आहे. मतांसाठी कोणीही आपल्याकडे आले नाही, या भाजप गट नेते संतोष शेट्टी यांच्या वक्तव्यावर मनोज काटेकर यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. काटेकर यांनी सांगितले की, त्यांनी पक्षाचे ज्येष्ठ नेते मदनबुवा नाईक यांच्यासह सलग तीन दिवस संतोष शेट्टी आणि आमदार महेश चौघुले यांची भेट घेतली होती. त्यांनी स्पष्ट केले की, स्थायी समितीत शिंदेसेनाचे पाच आणि भाजपचे चार सदस्य आहेत. शिवसेनेने भाजपच्या पाठिंब्याची विनंती केली होती. ते शक्य न झाल्यास, ते भाजपला पाठिंबा देण्यासही तयार होते.

मात्र, भाजपने दोन्ही प्रस्ताव फेटाळले. यावरून स्पष्टपणे दिसून येते की, भाजप भिवंडीमध्ये सेक्युलर फ्रंटसाठी काम करत आहे.

असे चिंताजनक आरोप शिंदेसेना गटाचे नेते मनोज काटेकर यांनी केला आहे.

# जनजातीय गरिमा उत्सवाचा शुभारंभ ६५४ गावांतील आदिवासी कुटुंबांपर्यंत विकास पोहोचविण्याचा निर्धार

**पालघर** : आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी आणि केंद्र शासनाच्या 'विकसित भारत' संकल्पनेला गती देण्यासाठी पालघर जिल्ह्यात 'जनभागीदारी अभियान' अंतर्गत 'जनजातीय गरिमा उत्सवा'चा उत्साहपूर्ण प्रारंभ करण्यात आला. "सर्वात दूर, सर्वात पहिले" या ब्रीदवाक्याने प्रेरित या अभियानातून दुर्गम भागातील प्रत्येक पात्र आदिवासी कुटुंबापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला.

जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. विशाल खत्री आणि डॉ. अपूर्वा बासुर यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

PM-JANMAN आणि धरती आबा अभियानांतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक पात्र आदिवासी कुटुंबापर्यंत शासकीय योजनांची १०० टक्के व्याप्ती सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. यामध्ये आरोग्य तपासणी शिबिरे, सिकल सेल जनजागृती मोहीम, तसेच 'जनसुनावणी'च्या माध्यमातून नागरिकांच्या समस्यांचे जागीच निवारण करण्यात येणार आहे.

गावपातळीवर आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी आणि तक्रारींच्या निवारणासाठी 'आदि सेवा केंद्र' (ASK) ही संकल्पना राबविण्यात येणार असून, हे केंद्र ग्रामस्तरावर सन्मानाचे व्यासपीठ ठरणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, पालघर, डहाणू, तलासरी आणि वसई या आठ तालुक्यांतील तब्बल ६५४ गावांमध्ये हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रत्येक नोडल अधिकाऱ्याला 'लाभार्थी संतृप्ती'वर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी उपजिल्हाधिकारी रणजीत देसाई, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील यांच्यासह जव्हार आणि डहाणू प्रकल्पातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# औषधी दुकानाच्या बंद कालावधीत जनतेस अन्न व औषध प्रशासनाचे जाहीर आवाहन

**पालघर** : पालघर जिल्हयातील सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, दि.२०.०५.२०२६ रोजीच्या कालावधीत जिल्हयातील औषधी दुकानादारांच्या देशव्यापी संप असल्याबाबत या प्रशासनास ज्ञात झालेले आहे. सदर कालावधीत रुग्णांची गैरसोय होवु नये व औषधांच्या पुरवठा सुरळीत व्हावा या हेतुने काही पर्यायी व्यवस्था करण्याबाबत संघटनेस प्रशासनाकडुन कळविण्यात आलेले आहे. जेणेकरुन जनतेस औषधे उपलब्ध होतील व होणारी गैरसोय टाळली जाऊ शकेल.

सदर बंदबाबत हे प्रशासन खालीलप्रमाणे जाहीर आवाहन करीत आहे.

१. जिल्यातील संघटनेच्या सदस्यांना व्यापक जनहिती विचारात घेऊन नियोजीत बंदामध्ये सहभागी होऊ नये असे आव्हान करण्यात आले आहे.

२. किरकोळ व घाऊक विक्रेत्यांशी वैयक्तिक स्तरावर संपर्क साधुन नियोजीत बंदामध्ये सहभागी होऊ नये याबाबत आव्हान करण्यात येत आहे.

३. संप झाल्यास रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन काही दुकाने संपातही उघडी राहतील याची दक्षता घेण्यास संघटनेच्या पदाधिऱ्यांना सुचना दिल्या आहेत संपर्कासाठी पालघर येथील संबधीत व्यक्तीची यादी भ्रमणध्वनी क्रमांकासह या प्रसिध्दीपत्रकासोबत देण्यात येत आहे.

४. जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व अध्यक्ष इंडियन मेडिकल असोसिएशन, पालघर यांना त्यांच्या आधिपत्याखालील रुग्णालयात नियोजीत संपाच्या पार्श्वभुमीवर औषधांचा पुरेसा साठा करून ठेवण्याची विंनती करण्यात आली आहे.

५. सरकारी, निमसरकारी व खाजगी दवाखान्यांनी रुग्णांची गैरसोय होवु नये या दृष्टीने मुबलक औषधीसाठा दि.२०. ०५.२०२६ पुर्वीच उपलब्ध करुन ठेवावा.

६. रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन आणिबाणीच्या प्रसंगी औषधांची आवश्यकता भासल्यास रुग्णांनी/ नातेवाईकांनी अन्न व औषध प्रशासन म.रा पत्ता सहायक आयुक्त यांचे कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, पालघर, प्रशासकीय कार्यालय अ, कक्ष क्र.१०४, पहिला मजला, कोळगाव, पालघर-बोईसर रोड, जिल्हा पालघर-४०१४०४ खालील नमुद अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. म.अ.गाडेकर | सहायक आयुक्त, पालघर परिमंडळ-०१ व ०३ | ७७०९११००७६ |
| २. | श्री.उ.भा.घरोटे | सहायक आयुक्त, पालघर परिमंडळ-०२ | ९५९५८२९८९५ |
| ३. | श्री.स.हि.चव्हाण | औषध निरीक्षक | ७७६८८२७८२७ |
| ४. | श्री.आर.बी.डोईफोडे | औषध निरीक्षक | ७८७५९०८१०५ |
| ५. | श्री.प्र.वि.ब्राम्हणकार | औषध निरीक्षक | ८७८०१८६६८२ |




**ठाणे : ठाणे केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या वतीने ब जिल्हाधिकारी कार्यालय समोर रेस्ट हाउस येथे निदर्शने करण्यात आले.**

# नोंदणी न करणाऱ्या कृत्रिम रेतन संस्थांवर होणार कडक कारवाई; पशुसंवर्धन आयुक्तांचे आदेश

**ठाणे :** राज्यातील गाई आणि म्हशींच्या जातींमध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी तसेच प्रजनन प्रक्रियेवर कायदेशीर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३" लागू केला आहे. मात्र, या कायद्याची अंमलबजावणी सुरू होऊनही अद्याप क्षेत्रीय स्तरावरील अनेक खाजगी कृत्रिम रेतन सेवादात्यांनी आणि संबंधित संस्थांनी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे' आपली अधिकृत नोंदणी केलेली नाही. ही गंभीर बाब समोर आल्यानंतर पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी अधिनस्त अधिकारी वर्गाला कडक निर्देश देत, अशा अनधिकृत आणि नियमबाह्य काम करणाऱ्या सेवादात्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यामध्ये या महत्त्वपूर्ण कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून अधिकृतपणे सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित चालणाऱ्या गैरप्रकारांना पूर्णपणे आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. नव्या नियमांनुसार राज्यातील सर्व रेत केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि वैयक्तिक सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या संस्थांना केवळ प्रमाणित आणि उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरण्याची परवानगी असेल. या सर्व प्रक्रियांवर कडक देखरेख ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची' स्थापना करण्यात आली असून, या प्राधिकरणाला केंद्रांची अचानक तपासणी करणे, झडती घेणे आणि नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे पूर्ण कायदेशीर अधिकार देण्यात आले आहेत.

या कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अतिशय कडक कायदेशीर कारवाई आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास आणि दोष सिद्ध झाल्यास पन्नास हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. तसेच, नोंदणी प्रमाणपत्राशिवाय गोजातीय प्रजनन क्रिया करणे, किंवा प्रमाणित वळूव्यतिरिक्त इतर वळूंपासून गोठवलेले रेत उत्पादन केल्यास एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. याशिवाय, मंजूर सेवांबाबत चुकीची किंवा दिशाभूल करणारी जाहिरात अथवा प्रसिद्धी केल्यास दोषी व्यक्तीला सहा महिन्यांपर्यंतचा साधा कारावास किंवा दोन लाख रुपयांपर्यंतचा दंड, अथवा या दोन्ही शिक्षा एकाच वेळी होऊ शकतात. त्यामुळे संभाव्य कारवाई आणि फौजदारी गुन्हे टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्तांनी केले आहे.

हा कायदा शेतकऱ्यांच्या आणि पशुपालकांच्या दृष्टीने अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. वैज्ञानिक व नियंत्रित प्रजननामुळे पशुधनाचा दीर्घकालीन विकास होणार असून, सुधारित व उच्च उत्पादनक्षम वंशामुळे दुधाच्या उत्पादनात मोठी वाढ होणार आहे.

# ऑनलाइन औषध विक्रीविरोधात बोईसर केमिस्ट वेल्फेअर असोसिएशनचा कडकडीत बंद

**पालघर / सुशांत संखे** : ऑनलाइन औषध विक्री बंद करावी, कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवास्तव सवलती थांबवाव्यात तसेच बनावट औषध विक्रीला आळा घालावा या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय केमिस्ट संघटनांनी पुकारलेल्या देशव्यापी बंदला बोईसरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बोईसर केमिस्ट वेल्फेअर असोसिएशन या संघटनेच्या नेतृत्वाखाली बोईसरमधील सुमारे १८० औषध विक्रेत्यांनी आपली दुकाने दिवसभर बंद ठेवून आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला.




बंदमुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी संघटनेकडून विशेष खबरदारी घेण्यात आली होती. आपत्कालीन व जीवनावश्यक औषधांसाठी १४ मेडिकल स्टोअर्स पर्यायी व्यवस्थेद्वारे सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे अत्यावश्यक वैद्यकीय सेवा सुरू राहिल्या.

ऑनलाइन माध्यमातून औषध विक्रीमुळे स्थानिक औषध विक्रेत्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून नियमांचे उल्लंघन करून औषधांची विक्री केली जात असल्याचा आरोप औषध विक्रेत्यांनी यावेळी केला. तसेच औषध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून ऑनलाइन माध्यमातून होणाऱ्या औषध विक्रीवर तातडीने बंदी आणावी, अशी मागणीही संघटनेकडून करण्यात आली. केवळ नोंदणीकृत फार्मासिस्टच्या देखरेखीखाली आणि वैध डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवरच औषध विक्री झाली पाहिजे, अशी आग्रही भूमिका संघटनेने मांडली.


> "रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या या बेकायदेशीर ऑनलाइन विक्रीला आळा घालण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने त्वरित ठोस पावले उचलावीत. अन्यथा भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."
>
> **अनिल अहिरे -अध्यक्ष, बोईसर केमिस्ट वेल्फेअर असोसिएशन**

आजचा बंद यशस्वी करण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष अनिल अहिरे यांच्या नेतृत्वाखाली रियाझ खेरानी, अनिल जैन, विठोबा मराठे, जगदीश चौधरी, महेश परिहार, अरुण पांडे, उस्मान नेक, दिलीप जैन, मनीष पाटील, राकेश शहा, दत्तात्रेय काळे, आकाश संखे, प्रशांत कोठावडे, श्रेयश पिलाई यांच्यासह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# पनवेल तहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी 30 हजाराची लाच स्वीकारताना लाच लुचपत खात्याच्या जाळ्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ,(वार्ताहर)** : पनवेल गावदेवीपाडा येथील 4.22 गुंठे जमिनीचे सातबाऱ्यावर नावाची नोंद मंजूर करण्याकरिता पनवेल तहसील कार्यालयात कार्यरत असणारे मंडळ अधिकारी गोवर्धन माने यांनी फिर्यादीकडे 50 हजाराची लाच मागितली होती. त्यातील 30 हजार रुपयाची लाच स्वीकारताना अलिबाग रायगड लाच लुचपत पथकाने आज सायंकाळी रंगेहाथ पकडले आहे. फिर्यादी यांच्याकडे पनवेल तहसील



कार्यालयात कार्यरत असणारे मंडळ अधिकारी गोवर्धन माने यांनी त्यांचे काम करण्याकरिता स्वत:करिता 20 हजार रुपये तसेच थंब अ‍ॅप्रुव्ह करून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी 10 हजार रुपये असे एकूण 30 हजार रुपयाची मागणी केली होती. सदर रक्कम आज सायंकाळी पंचमुखी हनुमान शेजारी मिठास स्वीटस् समोर स्वीकारत असताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या रायगड अलिबाग पोलीस उपअधिक्षक श्रीमती. सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून गोवर्धन माने यांना रोख रक्कम स्वीकारताना ताब्यात घेतले आहे.

# बोरगाव सारवणीत दोन कत्तलखान्यांवर छापे

## ग्रामीण पोलिसांनी मंगळवारी पहाटेच टाकले छापे; गोमांस व जिवंत वासरे जप्त

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील बोरगाव सारवणी येथील दोन कत्तलखान्यांवर सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी मंगळवारी (दि. १९) सकाळी साडेपाच ते सहाच्या सुमारास छापा टाकून गोमांस व जिवंत वासरे जप्त केले.सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी बोरगाव सारवणी येथे मंगळवारी सकाळी दोन ठिकाणी चालू असलेल्या अवैध कत्तलखान्यावर छापे टाकले. या वेळी कसईवाडा येथे ८० हजार रुपये किमतीचे गोवंश मांस व साहित्य जप्त केले. त्याचबरोबर दुसऱ्या ठिकाणी मेहरुण मशीदजवळ पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकून दीड लाख रुपये किमतीचे गोवंश मांस व चार जिवंत वासरे (किंमत २० हजार रुपये) आणि यासाठी लागणारे साहित्य जप्त केले. या प्रकरणी विनोद भगवान सरोदे (पोका, पो.स्टे . सिल्लोड ग्रामीण) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी नाजीम रशीद कुरेशी (रा. बोरगाव सारवणी, ता. सिल्लोड , जि. छत्रपती संभाजीनगर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

तर दुसऱ्या कारवाईत बबन विठ्ठल ढोके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी जाबिर बिलाल शेख, जुबेर जाबिर शेख व कदीर बिलाल शेख (सर्व राहणार बोरगाव सारवणी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदरील कारवाई पोलीस निरीक्षक रविंद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक संजय आगे, अमोल रोकडे , पो. हे. कॉ. सचिन काळे, विष्णू कोल्हे, विनोद सरोदे , यतिन कुलकर्णी, तायडे, व्यवहारे, जाधव यांनी केली.